सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३१२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १७ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# नवनीत राणा यांना पक्षातून निष्कासीत करा

## भाजपा उमेदवारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र –आमचा पराभव जनतेने नव्हे नवनीत यांनी केला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**

आम्ही भाजपाचे निष्ठावंत, परिश्रम करणारे व समाजाशी नाळ जुळलेले उमेदवार होतो. या मनपा निवडणुकीत आमचा पराभव विरोधी पक्षाने नव्हे तर भाजपाच्याच वरिष्ठ नेत्या नवनीत राणा यांनी पक्षाशी खुलेआम गद्दारी करून केला आहे. भाजपात राहून भाजपाचाच काटा काढण्याचे काम त्यांनी केले असल्याने त्यांचे पक्षातून निष्कासन करण्यात यावे, अशी मागणी भाजपाच्या २२ उमेदवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीने चांगलीच खळबळ उडाली आहे.

मुख्यमंत्र्यांना सामुहीकपणे पाठविलेल्या पत्रात उमेदवार पुढे म्हणतात, नवनीत राणा यांना भाजपातून बाहेरचा रस्ता न दाखवल्यास त्या भविष्यात अमरावती शहरात भाजपाचा पूर्णपणे नायनाट केल्या शिवाय राहणार नाहीत. त्यांनी प्रथम भाजपाचे गढ असलेल्या प्रभागात स्वतःचे उमेदवार टाकून त्या संपूर्ण पॅनेलवर वरवंटा कसा फिरवला जाईल, याचे नियोजन केले. एकीकडे भाजपाच्या सर्व पोस्टर्सवर स्वतःचा मोठा फोटो टाकून घेतला. त्यासाठी आमच्यावर शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांचा दबाव होता. नंतर नवनीत यांनी डॉ. धांडे यांच्या माध्यमातून संपूर्ण संघटना घरी बसवली. डॉ. धांडे यांचा वापर करून अधिकृत उमेदवारांची उमेदवारी मागे घेतल्याचे पत्र काढून त्या पत्राचा वापर शहरभर केला. संघटनेचे पदाधिकारी निवडणुकीत कुठेच दिसत नव्हते. शेवटच्या पाच दिवसात नवनीत राणा खुलेआम भाजपाच्या विरोधात प्रचारात उतरल्या. भाजपाचे उमेदवार डमी आणि युवा स्वाभिमानचे उमेदवार हेच खरे भाजपाचे उमेदवार असा आक्रमक प्रचार केला. निवडणुकीत पैश्याची लयलूट केली. आमच्या प्रभागात मतदारांवर प्रचंड दबाव उभा केला. नवनीत स्वतः भाजपाच्या नेत्या असल्याने त्यांनी भाजपा पदाधिकारी सोबत घेतले आणि त्यांनी आमच्या पराभवासाठी कंबर कसली. मोहल्लूया मोहल्लूयात, प्रत्येक नगरात कडाडून भाषणे, प्रचार रॅली काढून




आमच्या उमेदवारीविषयी जनतेत संभ्रम उभा केला. आम्ही जिथे लोकांना भेटलो तिथे लगेच नवनीत राणा जाऊन आमच्या प्रचारावर पोछा मारत होत्या. प्रत्येक ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा आम्हाला आशीर्वाद असल्याचे आणि तेच पाठीशी असल्याचे राणा दाम्पत्य खुलेआम सांगत होते. भाजपाचे मतदार या प्रचाराने संभ्रमित झाले.

आम्ही सर्वांनी लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा आणि विधानसभा निवडणुकीत आ. रवी राणा यांचे झोकून देऊन काम केले. पण, नवनीत यांनी जाहीरपणे आम्हालाच गद्दार ठरवून आमच्या सारख्या सामान्य कार्यकर्त्यांना उध्वस्त केले. भाजपाच्या प्रभावक्षेत्रात भाजपाला मूठमाती देऊनच राणा दाम्पत्याने मनपा निवडणुकीत आपली राजकीय ताकद सिद्ध केली. पत्नीला 'स्टार प्रचारक' भाजपा नेता दर्शवून भाजपा उमेदवारांना योजनापूर्वक पाडण्याचे काम राणा दाम्पत्याने केले. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रभावक्षेत्रात राणा दाम्पत्य फिरकले देखील नाही. तिथे भाजपा कमी करण्याची छुपी व्यूहरचना त्यांनी आखली.

आम्ही हरलो. पराभव आम्हाला मान्य आहे. पण आमचा पराभव जनतेने नव्हे नवनीत राणा यांनी कमळ हातात घेऊन पक्षाशी गद्दारी करून केला. भविष्यात भाजपाचा सुपडा साफ होऊ नये म्हणून कळकळीने आम्ही पक्ष नेतृत्वाला विनंती करतो की, एखादा पराजय झाला तरी चालेल पण यांच्या नादी लागून पक्ष संपवू नका.परींपशर्शी 'िरपर तात्काळ नवनीत राणा यांना युवा स्वाभिमान पक्षासाठी मोकळे करा. यांनी अशीच राष्ट्रवादी काँग्रेस संपवली होती. राकाँला पुन्हा पक्ष उभा करायला दहा वर्ष लागले. भाजपा वाचवा ही आमची विनंती आहे. आमच्या पैकी काही सहकारी विजयी झाले आहेत. पण, त्यांना हरवण्यासाठी देखील नवनीत राणा यांनी कसून प्रयत्न केल्याचे निवेदनात नमुद आहे. निवेदनावर आशिष अतकारे, अभिजित वानखडे, चेतन गावंडे, ऋषी खत्री, डॉ. वीरेंद्र ढोबळे, नरेश धामाई, सुनंदा खरड, मृणाली चौधरी, चेतन पवार, रोशनी वाकडे, बरखा शर्मा, रिटा मोकळकर, संतोष पिढेकर, गौरव बांते, प्रणित सोनी, योगेश निमकर, राजेश पड्डा साहू, लता देशमुख,स्वाती निस्ताने यांनी स्वाक्षरी केल्या आहे.

# भाजपने ठाकरेंच्या हातातून मुंबई हिसकावली

# आता महापौर कोण होणार ?

## जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत वाट पाहावी लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. यामध्ये भाजपने ८९ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष होण्याचा बहुमान मिळवला. तसेच मुंबई महानगरपालिकेवर गेल्या २५ वर्षांपासून असलेली शिवसेना आणि ठाकरेंची सत्ता भाजप-शिंदे सेनेच्या युतीने उलथवून लावली. यंदाच्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीपूर्वी मुंबईचा महापौर कोण होणार, याची जोरदार चर्चा रंगली होती. ठाकरे बंधूंनी मुंबईचा महापौर हा मराठी व्यक्तीच असेल, असे जाहीर केले होते. त्यामुळे सुरुवातीला मुंबईचा महापौर हिंदू होणार, असे बोलणाऱ्या भाजपला नंतरच्या टप्प्यात मुंबईचा महापौर




मराठी व्यक्तीच होईल, हे स्पष्ट करावे लागले आहे. आता भाजपने मुंबई जिंकल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेचा महापौर कोण होणार, याची उत्सुकता सर्वांना लागली आहे. याबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

मुंबईचा महापौर नेमका कोण होणार, यासाठी जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत वाट पाहावी लागणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, जानेवारी अखेरीस महापौर निवड होण्याची शक्यता आहे. पुढील आठवड्यात नगरविकास खाते महापौर पदासाठी सोडत काढणार आहे. महापौर सोडतीनंतर १० दिवसांनी मुंबईचा महापौर निवडला जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजपने ८९ आणि शिंदे सेनेने २९ जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे नैसर्गिकरित्या महापौर पदावर भाजपचा दावा आहे. मात्र, शिंदे सेनेच्या काही नेत्यांनीही मुंबईच्या महापौरपदावर दावा ठोकला आहे. मुंबई महानगरपालिकेत सत्तास्थापन करण्यासाठी ११४ जागांची गरज आहे. हा आकडा भाजपला एकट्याला गाठता येणार नाही. त्यामुळे त्यांना शिंदे गटाची मदत घ्यावीच लागणार आहे. त्यामुळे शिंदे गट महापौरपदासाठी अडून बसणार का, हे बघावे लागेल.

मुंबईतील अमराठी मतदारांनी भाजपला एकगठ्ठा मतदान करुन त्यांच्या विजयात मोठा वाटा उचलला आहे. मुंबईतील मराठीबहुल भागात ठाकरे बंधूंच्या जागा निवडून आल्या. मात्र, अमराठी लोकसंख्या असलेल्या भागांमधून भाजपला मोठे यश मिळाले होते. मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर आहे. त्यामुळे जगातील अन्य देशांप्रमाणे कॉस्मोपॉलिटीन मुंबईत अमराठी व्यक्ती महापौर झाल्यास गैर काय, असा युक्तिवाद काहीजणांकडून करण्यात आला होता. त्यामुळे भाजप खरोखरच मुंबईत अमराठी व्यक्तीला महापौरपदी बसवणार का, हे बघावे लागेल. महापौरपदासाठी भाजपमधील अनेक नगरसेवक इच्छूक आहेत. यापैकी कोणाची महापौरपदी वर्णी लागणार, हे बघावे लागेल.

# एकनाथ शिंदेंची प्रकृती अस्वस्थ

## निवडणुकीत जास्त धावपळ झाल्याचा परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

महापालिका निवडणुकीत जास्त धावपळ झाल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रकृती अस्वस्थ झाली आहे. डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिल्यामुळे एकनाथ शिंदे यांनी त्यांचे दिवसभरातील सर्व कार्यक्रम राखीव ठेवले असल्याची माहिती आहे. प्रकृतीच्या कारणास्तव एकनाथ शिंदे हे कॅबिनेटच्या बैठकीलाही उपस्थित नव्हते. तशी त्यांनी मुख्यमंत्र्यांना आधीच कल्पना दिली होती अशी माहिती आहे.

महापालिका निवडणुकीमध्ये गेल्या महिनाभरात एकनाथ शिंदे यांनी मुंबईसह राज्यभर सभांचा धडाका लावला होता. राज्यातील सर्व प्रमुख महापालिकांमध्ये त्यांनी सभा घेतल्या. या दरम्यान झालेल्या धावपळीमुळे एकनाथ शिंदेंची प्रकृती अस्वस्थ झाल्याची माहिती आहे.

**कॅबिनेटला गैरहजर**

तब्येत बरी नसल्याने एकनाथ शिंदे आज झालेल्या राज्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीलाही उपस्थित नव्हते. तशी त्यांनी मुख्यमंत्र्यांना आधीच कल्पना दिली होती. डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांतीचा सल्ला




दिल्यामुळे शनिवारी दिवसभरातील सर्व कार्यक्रम शिंदेंनी राखीव ठेवल्याची माहिती सूत्रांनी दिली.

दुसरीकडे, उपमुख्यमंत्री अजित पवार हेदेखील मंत्रिमंडळाच्या बैठकीला गैरहजर राहिले. बारामतीमध्ये कृषी प्रदर्शनाचा कार्यक्रम असल्याने अजित पवार हे मंत्रिमंडळाच्या बैठकीला येऊ शकले नसल्याची माहिती आहे.

**शिंदेंचे नगरसेवक हॉटेलमध्ये मुक्कामी**

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने ९० जागांवर उमेदवार दिले होते. यामध्ये २९ जागांवर शिंदेंच्या शिवसेनेने विजय मिळवला. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या निकालानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी एक खास प्लॅन केला आहे. निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांना एका हॉटेलमध्ये ठेवणार असल्याची माहिती समोर आली आहे. सत्तास्थापनेच्या दिवसापर्यंत एका फाईव्ह स्टार हॉटेलमधे नवनिर्वाचित नगरसेवकांना ठेवले जाणार आहे.

ठाण्यात आम्ही जास्त जागा लढवल्या असत्या तर जास्त नगरसेवक निवडून आले असते असं वक्तव्य भाजप आमदार संजय केळकर यांनी केलं. ठाण्यात भाजपनं ३९ जागा लढवल्या, त्यात २८ नगरसेवक निवडून आले. त्यामुळे भाजपचा स्ट्राईक रेट सर्वाधिक असल्याचं निरंजन डावखरे यांनी म्हटलं.

# भाजपाचा बालेकिल्ला नागपुरात 'एमआयएम'ची एन्ट्री

## दंगलीतील मास्टरमाईंडच्या पत्नीचा विजय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नागपूर**

भाजपाचा मजबूत बालेकिल्ला अशी ओळख असलेल्या नागपुरात 'एमआयएम' पक्षानं एन्ट्री केली. त्यामुळं भाजपा आणि काँग्रेसला धडकी भरली आहे. रात्री उशिरा जाहीर झालेल्या नागपूर महानगरपालिका निकालामध्ये 'एमआयएम' पक्षाचे सहा नगरसेवक निवडणूक जिंकले. नागपुरात महालसह इतर भागात उसळलेल्या दंगलीचा पोलिसांनी मास्टरमाईंड ठरवलेल्या फहीम खानची पत्नीसुद्धा 'एमआयएम'ची उमेदवार नगरसेवक म्हणून निवडणूक जिंकली आहे.

राज्यभरात एमआयएमचा बोलबाला – सोलापूर, धुळे आणि नांदेडमध्ये एमआयएमचे प्रत्येकी ८, १० आणि १४ असे एकूण ३२ उमेदवार विजयी झाले आहेत. तर मुंबई महापालिकेमध्येही एमआयएमनं मुसंडी मारत तब्बल आठ जागांवर विजय मिळवला आहे. मुस्लिमबहुल परिसरात समाजवादी पार्टीला मागे सारत अनेक ठिकाणी एमआयएमची सरशी झाल्याचं दिसून आलं. तर एमआयएमचे अमरावतीत १२, ठाण्यात ५, नागपुरात ६ नगरसेवक विजयी झाले आहेत. मुंबईत



मनसेच्या तुलनेत एमआयएमचे जास्त नगरसेवक निवडून आले आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये एमआयएम हा दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष असून, त्यांना तब्बल ३३ जागा जिंकता आल्या आहेत. त्यामुळं राज्यभरात एमआयएमचे तब्बल १२५ नगरसेवक विजयी झाले आहेत.

नागपूरच्या राजकारणात एमआयएमची एन्ट्री – एआयएमआयएम या पक्षानं प्रथमच नागपूरच्या राजकारणात पाऊल टाकत थेट सहा नगरसेवक निवडून आणले, तर मुस्लिम लिगचे चार उमेदवार विजयी झाले. त्यामुळं आता नागपूर महानगरपालिकेत मुस्लिम समुदायाचे दहा नगरसेवक निवडून आले आहेत. शहराच्या राजकारणात हा बदल दूरगामी परिणाम करणारा ठरण्याची चिन्हं आहेत. याआधीच मुस्लिम लिगची नागपूरमध्ये मर्यादित उपस्थिती होती. मात्र, एआयएमआयएमनं यंदा पहिल्याच प्रयत्नात झेंडा रोवत आपली ताकद दाखवून दिली.

फहीम खानच्या पत्नीची मनपात एन्ट्री – निवडणूक निकालामध्ये एक अत्यंत वादग्रस्त आणि चर्चेचा निकालही समोर आला आहे. मार्च २०२५ मध्ये महाल परिसरात उसळलेल्या दंगलीचा मास्टरमाईंड असल्याचा आरोप ज्या 'मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टी'चे शहराध्यक्ष फहीम खान याच्यावर करण्यात आला होता, त्याची पत्नी अलिशा खान या महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग तीनमधून विजयी झाल्या आहेत. हा निकाल केवळ राजकीयच नव्हे, तर प्रशासकीय आणि सामाजिक पातळीवरही अनेक प्रश्न उपस्थित करणारा मानला जात आहे.

# ठाकरे बंधू छत्रपती संभाजी राजेंना पकडण्यात मदत करणाऱ्यांसारखेच

## जयचंद आरोपावर भाजपचा पलटवार;नितेश राणेंचे प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटाने विजय मिळवत सत्ता हस्तगत केली, तर शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला पराभव स्वीकारावा लागला. केवळ मुंबईच नव्हे तर राज्यातील २९ महापालिकांपैकी सुमारे २५ महापालिकांमध्ये भाजपने निर्विवाद वर्चस्व सिद्ध केलं आहे. या निकालानंतर राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली असून आरोप-प्रत्यारोपांची तीव्रता वाढली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे आणि भाजपवर जोरदार हल्लाबोल करताच भाजपचे मंत्री नितेश राणे यांनीही तितक्याच आक्रमक भाषेत प्रत्युत्तर दिलं आहे.

संजय राऊत यांनी मुंबईतील सत्तांतरासाठी थेट एकनाथ शिंदेंना जबाबदार धरत अत्यंत जहाल शब्दांत टीका केली. एकनाथ शिंदे जयचंद झाले नसते, तर भाजपच्या शंभर पिढ्या उतरल्या असत्या तरी मुंबईवर महाराष्ट्रद्वेष्ट्यांचा महापौर बसला नसता, असा आरोप त्यांनी केला. मराठी साम्राज्याचा जरीपटका खाली उतरवून त्याच हाताने ब्रिटिशांचा युनियन जॅक शनिवारवाड्यावर फडकवणाऱ्या बाळाजी पंत नातू आणि जयचंद यांच्या अवलादी असल्याचा घणाघाती हल्ला राऊतांनी केला. या वक्तव्यामुळे राजकीय वातावरण अधिकच तापलं असून भाजपकडून तत्काळ पलटवार करण्यात आला.



या टीकेवर भाजपचे नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी माध्यमांशी संवाद साधताना अत्यंत तीव्र शब्दांत प्रतिक्रिया दिली. संजय राऊत यांनी मुंबई अदानींच्या घशात घालण्याचा भाजपचा डाव असा आरोप केला होता. यावर बोलताना नितेश राणे म्हणाले की, काहींना चंगेज मुलतानींच्या घशात घालणं चालतं, बुरखेवाली मानसिकता चालते; पण अदानींसारख्या उद्योगपतींच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि मुंबईचा विकास होतो, ते यांना मान्य नाही. मुंबईचा विकास करणाऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणं आम्हाला मान्य आहे, पण जिहादी विचारधारेच्या घशात मुंबई घालणं आम्हाला कधीही मान्य नाही, असा जोरदार टोला त्यांनी लगावला.

राऊत यांनी शिंदे जयचंद नसते तर भाजपचा महापौर बसला नसता या विधानावरही नितेश राणे भडकले. त्यांनी ठाकरे बंधूंवर थेट गद्दारीचा आरोप करत ऐतिहासिक संदर्भांचा वापर केला. ज्या शिर्केने छत्रपती संभाजीराजेंची माहिती मुघलांना दिली आणि संगमेश्वरला त्यांना पकडण्यात मदत केली, त्यांच्यात आणि ठाकरे बंधूंमध्ये काहीच फरक नाही, अशी अत्यंत आक्रमक तुलना राणेंनी केली. या विधानामुळे वाद आणखी चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

नितेश राणे यांनी ठाकरे बंधूंवर हिंदू समाजात फूट पाडण्याचाही आरोप केला. पाकिस्तानमध्ये बसलेल्या अब्बाची स्क्रिप्ट मुंबईत वाचून दाखवण्याचं काम हे लोक करत होते, असा गंभीर आरोप त्यांनी केला. हिंदूंमध्ये फूट पाडण्यासाठीच ठाकरे बंधूंना सुपाऱ्या देण्यात आल्या होत्या, असं म्हणत त्यांनी राऊत आणि ठाकरे गटावर थेट निशाणा साधला. दुसऱ्यांना नावं ठेवण्यापेक्षा ज्यांची दाढी कुरवाळत होते, त्यांनाच जाऊन उत्तर द्या, असा सल्लाही राणेंनी दिला.

या संपूर्ण वादाच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेचा निकाल केवळ सत्तांतरापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो मराठी अस्मिता, हिंदुत्व, विकास आणि राजकीय निष्ठा या मुद्द्यांभोवती केंद्रित होताना दिसत आहे. भाजप आणि शिंदे गटाच्या विजयानंतर ठाकरे गटाकडून भावनिक आणि आक्रमक प्रतिक्रिया येत असताना, भाजप नेतेही तितक्याच धारदार भाषेत प्रत्युत्तर देत आहेत. यामुळे येत्या काळात विधानसभेपासून लोकसभेपर्यंत या वादाचे पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत.

एकीकडे भाजप राज्यातील बहुसंख्य महापालिकांमध्ये सत्ता मिळवून आपलं वर्चस्व अधोरेखित करत असताना, दुसरीकडे ठाकरे गट आक्रमक भूमिकेतून राजकीय संघर्ष अधिक तीव्र करत असल्याचं चित्र आहे. राऊत आणि राणेंमधील शब्दयुद्ध हे केवळ दोन नेत्यांमधील संघर्ष नसून, मुंबई आणि महाराष्ट्राच्या सत्तेसाठी सुरू असलेल्या दीर्घ राजकीय लढाईचं प्रतीक मानलं जात आहे.

## संपादकीय ......

# सकारात्मक कौल...

*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात संपूर्ण भारतात सुरू असलेल्या विकासपर्वाला, महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस देत असलेल्या गती-शक्तीला मुंबईसह राज्यातील महानगरांनी सकारात्मक कौल दिला आहे. 'अंधेरा छटेगा, सुरज निकलेगा, कमल खिलेगा' हे वाक्य उच्चारत ज्या महानगरात भाजपची स्थापना झाली होती, त्या मुंबईचा प्रथम महापौर भाजपचा होईल. हा पाडाव शिवसेनेच्या ठाकरे कुटुंबाच्या सहाय्याने नव्हे तर भाजपने नगरसेवकांचे शतक करत स्वतःच्या ताकदीवर गाठला आहे. २०१४ पासून नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या विकासाला देवेंद्र फडणवीस यांनी जोड दिली.*

*डबल इंजिनचे सरकार आपल्या शहरात, आपल्या गावात आणि आपल्या महानगरात अधिक शक्तीने धावावे ही महाराष्ट्रातील जनतेची इच्छा असल्याचे निकालातून दिसते. आर्थिक राजधानी मुंबईत अस्मितांच्या भाषिक राजकारणाऐवजी विकासाचे भविष्यगामी सत्ताकारण अधिक पसंत असल्याचे मतदारांनी दाखवून दिले. २०१९ साली भाजप आणि शिवसेनेचा एकत्रित विजय झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांना नाकारले गेलेले मुख्यमंत्रिपद ही एक दुखरी नस. या अध्यायाची परतफेड करणारे अनेकविध 'कार्यक्रम' भाजपने हिशेब चुकता करायला प्रत्यक्षात आणले. त्याची समाप्ती मुंबई महापालिका निवडणूक असेल हे स्पष्ट होते. खरे तर महाराष्ट्र आणि मुंबईवर भाजपने कायम शिवसेनेच्या सहाय्याने राज्य केले. हा आधार नाहीसा झाल्यावर दोघांचे काय झाले? तर शिवसेनेला महापौरपद गमवावे लागले आणि भाजप महापौरपद मिळवेल असे दिसते.*

*महाराष्ट्रातील महत्त्वाचे शहर असलेल्या जवळपास प्रत्येक ठिकाणी भाजपचा विकास पसंत असल्याचा कौल जनतेने दिलेला आहे. हा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचा आणि कर्तृत्वाचा सन्मान आहे, तसेच भाजपच्या संघटनात्मक बांधणीचे यश मानावे लागेल. विकासाचे राजकारण करत शहरांचे चित्र पालटून देणारी मेट्रो, उत्तम नगर योजना, सांडपाणी व्यवस्थापन, गरिबांना घरे, मध्यमवर्गीयांना उत्तम प्रवास अशा अनेक विविध योजना फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने कार्यान्वित केल्या. त्याची पावती या निकालांनी दिली, असे म्हणणे योग्य ठरेल. कोणताही निकाल हा नेत्याची राजकारणावरची पकड स्पष्ट करून दाखवतो, तसेच त्याला अनेकविध निर्णय घ्यायला प्रेरणा देत असतो. या निकालाने दिलेला जनतेचा हा कौल विनम्रपणे स्वीकारून महाराष्ट्राच्या विकासाच्या योजना गावोगावी पोहोचवण्याचे शिवधनुष्य देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या सहकार्यांना उचलावे लागणार आहे.*

*हे कार्य ते कशाप्रकारे करतात यावर त्यांची भविष्यातील वाटचाल अवलंबून राहीलच. शिवाय जातीपातीच्या-धर्माच्या वादात अडकलेल्या राज्याला आता या छोट्या लढायांऐवजी विकासाची कास पत्करावी लागेल. मुंबईच्या विविध भागांमध्ये शिवसेना हा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सुरू केलेला ब-ँड आजही ताजा आणि स्वीकारार्ह असल्याचेही निकालांनी मराठीबहुल भागात दाखवून दिले. बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा हा एकनाथ शिंदेंकडे नसून तो उद्धव आणि राज या त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींकडेच असल्याचे मुंबईत निकाल दाखवतात. उद्धव ठाकरे यांनी दुरावलेले बंधू राज ठाकरे यांना समवेत घेऊन मराठी मतांची मोट बांधली. २० जागांची घसरण झाली असली तरी आम्ही मराठी माणसाचा आवाज आहोत हे ठाकरे सांगू शकतील. आता त्यांनी मराठी माणसाला नवी स्वप्ने दाखवावीत ही अपेक्षा. प्रत्येक निकाल काहीतरी शिकवून जात असतो. तसा धडा तेथील राजकीय पक्ष घेऊ शकतात का हे त्यांनी ठरवायचे असते.*

*राज्याच्या अन्य भागांमध्येही भाजपला ज्या प्रकारे प्रतिसाद मिळाला ते लक्षात घेता महानगरीय मानसिकता ही मोदी-फडणवीस यांच्या मागे उभी असल्याचेही या कौलाने दाखवून दिले. कोणताही निकाल हा जबाबदार्या घेऊन येत असतो. राज्यात अत्यंत वेगाने वाढलेली शहरे मोठ्या प्रमाणात बकाल आहेत. वाहतूक समस्या, सांडपाणी व्यवस्थापन, गृहनिर्माण, कार्यालयांमध्ये जाताना नागरिकांना सोसावे लागणारे त्रास हे सगळे मुद्दे सुटले तर विकासाच्या यात्रेत नागरिक स्वतःचे योगदान देऊ शकतील. या शहरांचे संचित आणि ओळख लक्षात घेऊन ती ठळकपणे समोर आणावी लागेल. फडणवीस हे सर्व प्रश्न लक्षात घेऊन त्यावर प्रचारात भर देत असल्याचे दिसले, जनतेने त्यांना त्याचमुळे कौल दिलेला दिसतो. ती जबाबदारी पूर्ण करण्याचे आव्हान अर्थातच आहे. गेल्या काही दिवसांमध्ये सत्तेत एकत्र असलेल्या तिन्ही पक्षांनी जेथे शक्य आहे आणि ताकद आजमावायची आहे, तेथे परस्परांविरुद्ध उभे राहण्याचा प्रयत्न केला. आपापसातच जागा वाटून घ्यायच्या, हा त्या प्रयत्नांचा उद्देश होता. त्यातही भाजप सरस ठरला. भाजपबरोबर असलेल्या एकनाथ शिंदे यांनी जेथे जेथे स्वबळावर निवडणूक लढवली, तेथे तेथे जनतेने भाजपला कौल दिला.अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड येथे स्वाभिमानयज्ञ सुरू केला होता. त्या स्वाभिमान यात्रेला जनतेची पसंती नाही हे निकालांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात निदान नागरी भागात तरी शरद पवार ही शक्ती नाही. पवार कुटुंबाला फारसे स्थान नाही, हे देखील स्पष्ट झाले. पवार काका-पुतण्याला त्यांच्याच मैदानात मोठा पराभव पत्करावा लागला. विशेषतः पुण्यात झालेला नामुष्कीजनक पराभव पवारांच्या राजकारणाची भरकटलेली दिशा स्पष्ट करतो. राज्यातील अल्पसंख्याक जनता आधारासाठी काही पक्ष शोधते आहे, हेही लक्षात घ्यायला हवे. मुस्लिम अस्मितेची जहाल भाषा बोलणार्या एमआयएम या पक्षाला या निवडणुकीत मिळालेले यश लक्षवेधी आहे. कोणत्याही राज्याचा विकास हा अल्पसंख्याक आणि बहुसंख्याक या खेळावर होत नसतो तर तो समन्वयाचा एक प्रतीकात्मक भाग असतो. तो लक्षात घेऊन त्यासाठी आखणी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्राचे नवनिर्माण करायचे असेल तर ५२ टक्के जनतेला विश्वासात घेऊन त्यांना पुढे नेणारे काम करावे लागेल. त्यासाठी नव्या कारभार्यांना शुभेच्छा. स्थानिक स्वराज्य संस्था भ्रस्टाचाराचे कुरण झाल्या आहेत. त्यामुळे यशाचा उन्माद न बाळगता कामाला लागण्याचे भान नव्या कारभार्यांनी ठेवावे.*

## पाच महापालिकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादीला भोपळा

# राज्यात अजित पवार गटाला १५८, तर शरद पवार गटाची ३६ वर बोळवण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ मुंबई-** युतीची सत्ता वगळता अनेक वर्षे राज्याच्या सत्तेची सूत्रे हाती बाळगलेल्या दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसला भिवंडी-निजामपूर, नवी मुंबई, मिरा-भाईंदर, उल्हासनगर आणि वसई-विरार या पाच महानगरपालिकांच्या निवडणुकात साधा भोपळाही फोडता आला नाही. अजित पवार यांच्या गटाला २९ पैकी २४ महानगरपालिकांमध्ये १५८ तर शरद पवार गटाला केवळ ३६ जागांवर विजय मिळाला आहे. अजित पवार गटाला एकूण ९ आणि शरद पवार गटाला १९ महापालिकांमध्ये एकही नगरसेवक जिंकून आणता आला नाही. निवडणुका सहा महिन्यांवर आल्यानंतर बैठका आणि मतदार संघात गाठीभेटी घेण्याच्या कार्यशैलीमुळे ही नामुष्की आल्याची चर्चा दोन्ही पक्षांत सुरू झाली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड हा पवार कुटुंबीयांचा राजकीय बालेकिल्ला समजला जातो. आपला बालेकिल्ला सांभाळण्यासाठी अजित पवार आणि शरद पवार गटाने आघाडी केली. पण हा बालेकिल्लाही भाजपाने उद्ध्वस्त केला. पुणे महानगरपालिकेत अजित पवार गटाला २० तर शरद पवार गटाला एकही जागा मिळाली नाही. पिंपरी-चिंचवड महापालिका जिंकण्याच्या दिशेने मैदानात उतरलेल्या



अजित पवार गटाला या ठिकाणी ३६ जागा मिळाल्या तर शरद पवार गटाला येथेही भोपळा फोडता आला नाही. पिंपरी चिंचवडसह सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, पनवेल, जळगाव, लातूर, परभणी, नांदेड, नागपूर, चंद्रपूर आणि अमरावती महानगरपालिका मध्येही शरद पवार गटाची अशीच अवस्था राहिली. नको काका, नको पुतण्या असे म्हणत महापालिका क्षेत्रांतील नागरिकांनी अजित पवार व शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला नाकारले आहे.

महायुतीमध्ये असतानाही भाजपाने या महापालिका निवडणुकांमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सोबत घेतले नाही. त्यामुळे महापालिका निवडणुकीत पराभव टाळण्यासाठी त्यांनी शरद पवार यांच्या पक्षासोबत आघाडी केली होती. परंतु, हा खेळ मतदारांना आवडला नाही. तर नाईलाज म्हणून एकमेकांना मैत्रीची टाळी दिल्याचा परिणाम शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या अंगलट आला.

एकसंध भूमिका मांडण्यात अपयश

पुणे आणि पिंपरी - चिंचवड महानगरपालिका निवडणुकीची सूत्रे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतःकडे घेतली होती. त्यामध्ये शरद पवार गटाच्या नेत्यांना दुय्यम स्थान होते. अर्थमंत्री असलेले अजित पवार केवळ घोषणाचा पाऊस पाडत होते. महापालिकांमधील पाणी, वाहतूक, कचरा व्यवस्थापन, अनधिकृत बांधकाम, विकासकामांचा वेग या मुद्द्यांवर ठोस व एकसंध भूमिका मांडण्यात ते कमी पडले.

**राष्ट्रवादीच्या पराभवांची कारणे**

अनेक प्रभागांत दोन्ही राष्ट्रवादींचे उमेदवार एकमेकांचेच मत कापत राहिले.

शहरांमधील मूड ओळखण्यात अपयश

एकमेकांमधील अंतर्गत संघर्ष लपविता आला नाही.

**निवडणुकीची एकहाती सूत्रे**

पाणीटंचाई, वाहतूक कोंडी, पीएमपीएमएल/पीएमटी सेवा, कचरा व्यवस्थापन, अनधिकृत बांधकाम या मुद्द्यांवर दोन्ही राष्ट्रवादी गटांकडून ठोस आणि परिणामकारक मांडणीचा अभाव.


बूथ पातळीवरील यंत्रणा कमकुवत.

अनेक ठिकाणी पदाधिकारी निष्क्रिय.




# श्वासदुर्गंधीकडे दुर्लक्ष नको

**दि.१७विदर्भ प्रजसत्ताक -** मोठ्या आतड्याचा कर्करोग हा प्रामुख्याने आतड्याच्या किंवा मलाशयाच्या आतील अस्तरावर असलेल्या 'पॉलिप्स' (लहान गाठी) मध्ये सुरू होतो. 'क्लीव्हलँड क्लिनिक'च्या माहितीनुसार, या कर्करोगामुळे माणसाचे आयुर्मान साधारणपणे १० वर्षांनी कमी होऊ शकते. उपचारांनंतर रुग्ण किती काळ जगू शकतो, हे त्याचे वय, निदानाची वेळ, कर्करोगाचा टप्पा आणि एकूण आरोग्य यावर अवलंबून असते.



**श्वासदुर्गंधी अंतर्गत बिघाडाचे लक्षण**

आपल्या तोंडात, विशेषतः दातांवरील थरांमध्ये आणि हिरड्यांच्या संसर्गात 'फ्युसोबॅक्टेरियम न्यूक्लिएटम' नावाचा जीवाणू असतो. संशोधकांना असे आढळले आहे की, हाच जीवाणू कर्करोगाच्या गाठींमध्येही उपस्थित असतो. हा जीवाणू तोंडातून थेट आतड्यांपर्यंत पोहोचतो. हा जीवाणू कर्करोगाच्या पेशींना वाढण्यास आणि शरीराच्या इतर भागात पसरण्यास मदत करतो. निरोगी पेशींच्या तुलनेत कर्करोगग्रस्त पेशींमध्ये या जीवाणूंचे प्रमाण प्रचंड असते.

**प्रतिबंधात्मक उपाय**

अतिप्रमाणात साखरयुक्त पदार्थ आणि शीतपेये पिणे टाळावे. नियमितपणे दात घासणे आणि 'फ्लॉसिंग' (दातांमधील फटी स्वच्छ करणे) करणे आवश्यक आहे. श्वासदुर्गंधी दीर्घकाळ राहिल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# निकालाचा आनंद सांगू कुणाला...

आलो बाबा निवडून एकदाचा! लागला बाबा गुलाल कपाळाला! मुद्दाम पांढरे कपडेच घालून आलो होतो निकालाला. म्हणजे कपड्यांवर गुलाल स्पष्ट दिसावा म्हणून. फुटले एकदा फटाके प्रभागात आपल्या नावाचे! बिनविरोधच करणार होतो. पण म्हटलं, लोकशाहीत ते बरं दिसत नाही. आजचा दिवस नाचायचा. नाचा नाचा रे.. हिकडं तिकडं नाचा रे... वाकडं तिकडं नाचा रे...

कार्यकर्त्यांबरोबर आपल्याला बी नाचाय लागतंय. बायको निवडून आली तर बायकोला उचलून घ्यायला लागतंय! आता मला कोण उचलणार? चांगला एकशेदहा किलोचा गडी हाय मी! झालं एकदा, झेंगाट संपलं. आता मला उद्यापासून आठ-दहा दिवस गायब व्हायला लागेल. केरळला जाऊन मसाज घ्यावा लागेल! गोव्याला जाऊन रिलॅक्स व्हायला लागेल. फार्महाऊसवर जाऊन खाऊन पिऊन रिचार्ज व्हायला लागेल.पुन्हा मग महापालिकेत महापौरपदाची निवडणूक असेल. स्थायी समिती असेल... आता इन्कम सोर्स सुरू होतील. घातलेले पैसे निघायला तर हवेत. वचननामा आणि जाहीरनामा याचा विचार नका करू. निवडून आल्यावर आम्ही म्हणून तोच नामा! रस्ते काय, आज ना उद्या गुळगुळीत होतील. गटारांचं काय, पाऊस आल्यावर धो-धो वाहून जातील. शहराचा विकास तर आम्हालाच करायचा आहे, तो कुठे जातो? आन सगळाच विकास केला तर लोकं येतील का आमच्याकडं?




रोज कार्यकर्ते आपल्या गॅरेजमध्ये, पार्किंगमध्ये आणि कठड्यावर बसायला पाहिजेत. गरजू नागरिक आपल्याला भेटायला यायला हवे असतील तर प्रभागात काही ना काही अडचणी असल्याच पाहिजेत. त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आम्ही दर महिन्याला जनता दरबार भरवायचा म्हणतो. अडचणी लिहून घेण्यासाठी एक पी.ए. नेमावा लागेल. गरजू नागरिकांसाठी वेटिंग रूम हवी. तिथे चार-दोन पेपर ठेवले पाहिजेत. प्रत्येकाला एक कप चहा देण्याचीही व्यवस्था करू.साहेब कुठे आहेत म्हटल्यावर साहेब आंघोळीला गेलेत, साहेब देवपूजा करताहेत, साहेब कुत्र्याला फिरवायला गेलेत... अशी ठरावीक उत्तरे द्यायला आधी पी.ए.ला शिकवायला हवीत. एक ना दोन हजार योजना आमच्या डोक्यात आहेत. आधी सगळा गुलाल धुतला पाहिजे अंगावरचा!

# हरभऱ्यावरील शेंडे, पाने व रोपे कुरतडणाऱ्या अळीच्या किडीचा असा करा बंदोबस्त

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक**

हरभरा पिकाची पेरणी जवळजवळ सर्वत्र आटोपली असून हे पीक सध्या रोपावस्थेत असून सध्या या पिकावर कट वर्म म्हणजेच शेंडे, पाने व रोपे कुरतडणाऱ्या अळीच्या किडीचा प्रादुर्भाव संभवतो. त्यामुळे किडीचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नीलेश कानवडे यांनी दिली आहे.




**विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष**

**किडींची ओळख**

ही एक बहुभक्षीय कीड असून या किडीचा प्रादुर्भाव प्रामुख्याने उशिरा पेरणी केलेल्या पिकावर होतो.

मादी पतंग सुरूवातीस पीक व तणाच्या पानांवर तसेच कोवळ्या शेंड्यावर एक-एक करुन किंवा समूहाने ३०० ते ४५० अंडी घालते.

अळीची लांबी ही ०.२ ते १.५ इंच असते.

या अळीचा रंग हा भुरकट हिरवा, काळपट किंवा करडा असतो.

या अळीच्या पाटीवर करड्या रंगाचा पट्टा शरीराच्या दोन्ही बाजूने असतो.

शेतामध्ये पाने शेंडे कुरतडलेल्या अवस्थेत दिसून येतात.

मात्र अळी ही झाडाच्या बुंध्याला मातीमध्ये लपून बसते व मुख्यत्वे रात्री पिकावर येऊन पाने व शेंडे कुरतडते.

प्रादुर्भाव जास्त असल्यास दिवसा देखील ही अळी पिकावर आढळून येते.

पूर्ण वाढ झालेली अळी १.५ ते २ इंच लांब असते. अळीला स्पर्श केल्यास तो शरीराचा 'सी' आकार करताना दिसून येते.

पिकाच्या सर्व अवस्थामध्ये या अळीचा प्रादुर्भाव होवू शकतो.

ही कीड रोप अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास रोप कुरतडते व नंतरच्या अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास पाने व शेंडे कुरतडते.

पूर्ण वाढ झालेली अळी ही जमिनीमध्ये कोषावस्थेत जाते.

**असे करा व्यवस्थापन :**

शेत किंवा बांधावर कचऱ्याचे ढीग तसेच तण राहणार नाही असे नियोजन करावे.

प्रतिहेक्टर २० पक्षी थांबे शेतात उभारावेत. त्यामुळे पक्षी किडीच्या अळ्या खाऊन फस्त करतात.

या अळीचा प्रादुर्भाव लष्करी अळीप्रमाणे एकच वेळी आढळून येतो म्हणून शेतातील पिकांमध्ये मादी पतंगाने अंडी घालू नये, याकरिता प्रतिबंधात्मक उपाय म्हणून निंबोळी अर्क ५ टक्के किंवा अझाडिरेक्टीन ३०० पीपीएम ५० मिली किंवा अझाडिरेक्टीन १५०० पीपीएम २५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

प्रादुर्भाव २ अळ्या प्रतिमीटर ओळ अशी आर्थिक नुकसानीची पातळी आढळून आल्यास क्लोरपायरीफॉस २० टक्के ईसी ५० मिली किंवा क्लोरट्रनिपोल १८.५० टक्के ३.० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

आवश्यक भासल्यास १५ दिवसांच्या अंतराने दुसरी फवारणी करावी. अशी उपाययोजना केल्यास उत्पादनात नक्कीच वाढ होईल.

# कापूस ८१०० रुपये पार.. सरकीच्या दरात तेजी आल्याचा परिणाम; अजून किती वाढण्याची शक्यता?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती- :** केंद्र शासनाने कापसावर १ जानेवारीपासून १ टक्के आयात शुल्क पूर्ववत केले. याचदरम्यान सरकीची दरवाढ झाल्याने देशांतर्गत कापसाला उठाव आला. बुधवारी अमरावती बाजारात पहिल्यांदा कापसाचे दर ८१०० रुपये क्विंटलवर पोहोचले. शिवाय ३८ टक्क्यांवर झडती असलेला कापूस ८,४५० रुपये क्विंटल दराने विकला गेल्याची माहिती आहे.

केंद्र शासनाने कापसावरील ११ टक्के आयात शुल्क रद्द केल्याने परदेशातील कापसाची आवक वाढून देशांतर्गत कापसाला फटका बसला होता. १ जानेवारीपासून केंद्र शासनाने कापसावरील ११ टक्के आयात शुल्क पूर्ववत केल्याने कापसाला पुन्हा उठाव आला आहे. तत्पूर्वी, शेतकरी हमीभावाचे संरक्षण मिळण्यासाठी 'सीसीआय' कडे वळला, तर तेथेही आर्द्रतेचे कारण देत दरात कपात करण्यात आल्याने शेतकरी अडचणीत आले आहे.

दरवाढीवर या घटकाचा परिणाम

केंद्र शासनाने १ जानेवारीपासून कापसावरील ११ टक्के आयातशुल्क पूर्ववत केल्याने परदेशातील आयातीवर परिणाम होऊन देशांतर्गत उठाव



आला. सरकीच्या दरात तेजी आलेली आहे. त्याचवेळी दरवाढीच्या प्रतीक्षेत शेतकरी कापसाची साठवणूक करीत असल्याने आवक कमी झाली आहे. परिणामी कापसाची दरवाढ झालेली आहे.

**कापसाची जिल्हास्थिती (रु/क्विं.)**

- कापसाचे दर - ७,९०० ते ८,१००
- ३८ टक्के झडतीवर - ८,४०० ते ८,५००
- सरकीचे दर - ४,२०० ते ४,३००
- रुईचे दर - १५५ रु/किलो

**कापसाचे बाजारभाव (रु/क्विं.)**

- अमरावती - ७,९०० ते ८,१००
- सावनेर - ७,८५० ते ७,९००
- अकोला - ७,७८९ ते ८,०१०
- वर्धा - ७,६०० ते ८,२००
- घाटंजी - ७,७१५ ते ८,३००
- हिंगणघाट - ७,५०० ते ८,३५०

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा  आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १७ जानेवारी २०२६ शहर/ग्रामिण

# अमरावती मनपात सत्तेचा पेच; भाजप मोठा पक्ष, पण रिमोट 'युवा स्वाभिमान'कडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

शुक्रवारी सायंकाळी महानगरपालिका निवडणुकीचे निकाल स्पष्ट होताच शहरातील सत्तासमीकरण अधिकच गुंतागुंतीचे बनले आहे. ८७ सदस्यांच्या सभागृहात सत्ता स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेला ४४ हा जादुई आकडा गाठणे भाजपसाठी अवघड ठरणार असल्याचे चित्र आहे. सर्वाधिक २५ जागा जिंकून भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी सत्तेची चावी मात्र आमदार रवी राणा यांच्या 'युवा स्वाभिमान' पक्षाकडे असल्याचे स्पष्ट झाले आहे.निवडणुकीपूर्वी अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस 'किंगमेकर' ठरेल, अशी जोरदार चर्चा होती. मात्र, प्रत्यक्ष निकालात राष्ट्रवादीला केवळ ११ जागांवर समाधान मानावे लागल्याने त्यांची सौदेबाजीची ताकद सध्या तरी कमी झाली आहे. याउलट, रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाने १५ जागा जिंकत भाजपसमोर तगडे राजकीय आव्हान उभे केले आहे. या निकालामुळे सत्तास्थापनेचे सर्व गणित युवा स्वाभिमानभोवती फिरू लागले आहे.भाजपला बहुमतासाठी युवा स्वाभिमानच्या १५ आणि शिंदे गटाच्या शिवसेनेच्या ३ नगरसेवकांची साथ अनिवार्य ठरणार आहे. या संभाव्य युतीचा आकडा ४३ वर येत असल्याने भाजपला आणखी एका नगरसेवकाचा पाठिंबा शोधावा लागणार आहे. त्यामुळे भाजप कोणाला सोबत घेते आणि कोणत्या अटींवर सत्ता स्थापन



करते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.दरम्यान, पदांसाठी मोठ्या प्रमाणात 'बार्गेनिंग' रंगण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रवी राणा हे याआधीही भाजपसोबत राहिले असले, तरी आता त्यांच्या पक्षाकडे असलेल्या १५ जागांमुळे त्यांची सौदेबाजीची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. केवळ बाहेरून पाठिंबा देण्यापेक्षा मनपाच्या सत्तेत निर्णायक सहभाग मिळवण्यावर त्यांचा भर राहणार असल्याचे संकेत आहेत. विशेषतः स्थायी समिती सभापतीपद किंवा उपमहापौरपदासाठी युवा स्वाभिमानकडून ठाम दावा केला जाऊ शकतो, अशी चर्चा आहे.दुसरीकडे, काँग्रेसने १५ आणि एमआयएमने १२ जागा जिंकत चांगली कामगिरी केली असली, तरी सत्तास्थापनेच्या समीकरणापासून हे दोन्ही पक्ष सध्या दूर असल्याचे दिसते. राष्ट्रवादीची ताकद घटल्याने भाजपविरोधी आघाडी उभी राहण्याची शक्यता कमी झाली आहे. त्यामुळे भाजपची सत्ता येण्याची चिन्हे असली, तरी मनपाच्या सत्तेचा सुकाणू नेमका कोणाच्या हातात असेल, याचा अंतिम निर्णय रवी राणा यांच्या अटी व भूमिकेवरच अवलंबून राहणार आहे.

# पदभार स्वीकारल्यानंतर दुसऱ्याच दिवशी अचलपूर नगरपालिका ओसाड

## नागरिकांच्या अपेक्षांना तडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अचलपूर :**

अचलपूर नगरपालिकेत नवनिर्वाचित नगरसेवक व नगराध्यक्षांनी मोठ्या उत्साहात पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्याच दुसऱ्या दिवशी पालिकेतील कारभार पूर्णतः ठप्प झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. कार्यालयात एकही कर्मचारी उपस्थित नसल्याने सर्वसामान्य नागरिकांची कामे रेंगाळली असून, मोठ्या अपेक्षेने आलेल्या नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागले.नुकत्याच झालेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीत नागरिकांनी विकासाच्या अपेक्षेने आपले प्रतिनिधी निवडून दिले आहेत. मात्र पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच कार्यदिवशी प्रशासन आणि नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शुक्रवारी पालिकेच्या परिसरात नागरिकांचा रोष स्पष्टपणे दिसून आला. मिळालेल्या माहितीनुसार, अचलपूर



नगरपालिकेचे मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांनी बहिरम येथे खासगी स्वरूपाच्या पार्टीचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी नगरपालिकेतील सर्व नगरसेवक, पदाधिकारी तसेच कार्यालयीन कर्मचाऱ्यांना निमंत्रित करण्यात आले होते. परिणामी संपूर्ण नगरपालिका दिवसभर सुमसाम होती. कार्यालयातील खुर्च्या रिकाम्या, कर्मचारी गैरहजर आणि नागरिक मात्र वाऱ्यावर अशी स्थिती निर्माण झाली.विशेष बाब म्हणजे शनिवार व रविवार हे सुट्टीचे दिवस असताना असा कार्यक्रम कार्यदिवशी आयोजित करणे कितपत योग्य होते, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच दिवशी प्रशासनाकडून झालेल्या या प्रकारामुळे अचलपूर नगरपालिकेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

# देशपांडेंची तिकीट कापली अन् भाजपला फटका

## अंबापेठ 'ड' जागेवर राष्ट्रवादीचा विजय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती :**



अमरावती महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १३, अंबापेठ गोरक्षण प्रभागातील 'ड' या जागेवर भाजपला अंतर्गत नाराजीचा फटका बसला असून राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार रतन डेंडुले यांनी विजय मिळवला. भाजपकडून ॲड. प्रशांत देशपांडे हे उमेदवारीसाठी इच्छुक होते. त्यांनी मुलाखतही दिली होती. मात्र, भाजपच्या कोअर कमिटीने माजी नगरसेवक प्रणित सोनी यांना दुसऱ्यांदा संधी दिल्याने देशपांडे यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली.ही नाराजी दूर करण्यासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी देशपांडेंच्या निवासस्थानी भेट देत त्यांना स्वीकृत नगरसेवकपद देण्याचे आश्वासन दिले होते. तरीही पक्षातील अंतर्गत मतभेद निवडणुकीत स्पष्टपणे दिसून आले. परिणामी, ज्या प्रणित सोनी यांच्यासाठी देशपांडेंची उमेदवारी कापण्यात आली, तेच सोनी पराभूत झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे रतन डेंडुले यांनी सोनी यांना पराभवाचा धक्का देत बाजी मारली.भाजपमधील अंतर्गत कुरबुरी, नाराजी आणि संघटनात्मक विसंवाद याचा थेट परिणाम निकालावर झाला, असे राजकीय निरीक्षण व्यक्त केले जात आहे.

# हळदी-कुंकवाच्या निमित्ताने महिलांना लक्ष्य;

## चेनस्नॅचिंगचे दोन प्रकार, १.६० लाखांचा ऐवज लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती** : शहरात सध्या सुरू असलेल्या हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमांचा फायदा घेत दुचाकीस्वार चोरट्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. बडनेरा आणि राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवघ्या अर्ध्या तासाच्या अंतरात दोन महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने बळजबरीने हिसकावून नेल्याच्या घटना घडल्या आहेत. या घटनांमुळे विशेषतः एकट्या किंवा मैत्रिणींसोबत कार्यक्रमासाठी जाणाऱ्या महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.पहिली घटना बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील विजयपतनगर परिसरात दि. १५ जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे ७.१५ वाजताच्या सुमारास घडली. फिर्यादी ज्योती नंदकिशोर अंबुरे (वय ५७) या घरासमोरून जात असताना दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांना गाठले. अंदाजे २५ ते ३० वयोगटातील या चोरट्यांनी क्षणाचाही विलंब न करता ज्योती अंबुरे यांच्या गळ्यातील २० हजार रुपये किमतीची सुमारे ४ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत बळजबरीने हिसकावून नेली.

या झटापटीत पोतीचे पेंडंट खाली पडले असले तरी चोरटे सोन्याची पोत घेऊन घटनास्थळावरून पसार झाले. या प्रकरणी बडनेरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यानंतर अवघ्या अर्ध्या तासात म्हणजेच सायंकाळी सुमारे ७.४५ वाजताच्या सुमारास दुसरी घटना राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दत्तविहार कॉलनी परिसरात घडली. फिर्यादी मयुरी नितीनसिंग ठाकूर



(वय ३८) या आपल्या मैत्रिणीसोबत हळदी-कुंकू कार्यक्रमासाठी जात असताना काळ्या रंगाच्या दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांना गाठले.

दुचाकीवर मागे बसलेल्या इसमाने मयुरी ठाकूर यांच्या गळ्यातील २२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र आणि ६ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन असा एकूण अंदाजे १ लाख ४० हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने हिसकावून नेला. फिर्यादीने आरडाओरड करत चोरट्यांना पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र चोरटे वेगाने पळून जाण्यात यशस्वी झाले.

या दोन्ही घटनांमध्ये चोरट्यांनी एकसारखीच पद्धत वापरल्याचे दिसून येत आहे. विनाक्रमांकाची दुचाकी, दोन इसम आणि महिलांना एकट्या किंवा कार्यक्रमासाठी जाताना लक्ष्य करणे, असा समान धागा पोलिस तपासात समोर आला आहे. बडनेरा येथील सहायक पोलिस निरीक्षक सुमेध सोनोने तर राजापेठ येथील सहायक पोलिस निरीक्षक नितीन शिंदे हे अधिक तपास करीत आहेत. शहरात पुन्हा चेनस्नॅचिंगच्या घटना वाढत आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत असून महिलांनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# सूर्यगंगा नदीवरील पूल न बांधल्याने शेतकऱ्यांचा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा

## संपूर्ण शेतकऱ्यांनी मिळून लोकसहभागातून उभारला पूल.... वयोवृद्धांचे हाल प्रशासनाच्या निष्काळजीपणाविरोधात संताप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७तिवसा**

तिवसा तालुक्यातील निंभोरा दे.गावातील शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी सूर्यगंगा नदी पार करावी लागत असल्याने अक्षरशः जीव मुठीत धरून ये-जा करावी लागत आहे. अनेक वर्षांपासून या ठिकाणी पादन रस्त्यावर पूल किंवा बंधाऱ्याची मागणी प्रलंबित असून प्रशासनाच्या उदासीनतेमुळे शेतकऱ्यांचा संयम आता संपत चालला आहे.नदीला वर्षभर मोठ्या प्रमाणात पाणी राहत असल्याने शेतकरी, शेतमजूर आणि विशेषत महिलांना कंबरभर पाण्यातून चालत जावे लागते. शेतीकामासाठी जाणाऱ्या मजूर वर्गात महिलांचे प्रमाण अधिक असल्याने त्यांना या परिस्थितीचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. पाण्यातून जाताना कपडे पूर्णपणे भिजतात, त्यामुळे शेतात काम करताना अडचणी निर्माण होतात.रात्रीच्या वेळी वीजपुरवठा असताना ओलीतासाठी शेतात जाणे म्हणजे धोक्याशी खेळ ठरत आहे. पाण्यात साप, विंचू सारख्या इतर जंतूंचा धोका असल्याने जीवितहानी होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. महिलांबरोबरच वयोवृद्ध नागरिकांनाही कंबरभर पाण्यातून नदी पार करणे अशक्यप्राय झाले आहे.एकीकडे शासनाकडूनलाडकी बहीण अशा घोषणा दिल्या जातात, मात्र प्रत्यक्षात महिलांना शेतात जाण्यासाठी नदीतून कपडे भिजवत चालावे लागत असतील तर हा महिलांच्या सन्मानाचा अपमान नाही काय? असा संतप्त सवाल येथील ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. ही परिस्थिती सहन



करण्यापलीकडे गेल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे.प्रशासनाची दखल न घेतल्याने काही शेतकऱ्यांनी स्वखर्चातून तात्पुरत्या स्वरूपात बंधारा उभारण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र शासनाने करायचे काम शेतकऱ्यांना स्वतःच्या खिशातून करावे लागणे ही लाजिरवाणी बाब असल्याची भावना व्यक्त होत आहे.शेतकऱ्यांचा वाली कोणीच नाही. कोणतेही सरकार आले तरी शेतकऱ्यांची अवस्था 'जैसे थे'च राहते, असा रोष ग्रामस्थांनी व्यक्त केला.राजकीय नेत्यांनी केवळ निवडणुकीच्या वेळी नव्हे, तर प्रत्यक्ष निंभोरा येथे येऊन शेतकऱ्यांची दैनंदिन परिस्थिती पाहावी, अशी मागणी होत आहे. दररोज जीव धोक्यात घालून ये-जा करताना शेती करायची की सोडून द्यायची? असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.या ठिकाणी सूर्यगंगा नदीवर कायमस्वरूपी छोटा पूल तातडीने उभारण्यात यावा, जेणेकरून शेतकऱ्यांची दळणवळणाची समस्या सुटेल व

रात्री ओलितासाठी शेतात जाणे म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखे झाले आहे.कंबरभर पाण्यातून वाट काढावी लागते, पावसाळ्यात तर परिस्थिती आणखीनच भयावह असते हा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असताना प्रशासन मात्र डोळेझाककरतआहे.शेतकऱ्यांनी स्वतःच्या कष्टातून उभारलेला छोटासा पूल ही आमची हतबल सुरुवात आहे.पण प्रशासनाने केव्हा जागे होऊन कायमस्वरूपी तोडगा काढणारनसेल तर शेतकऱ्यांनी काय कराव **–ऋषिकेश निंघोट** शेतकरी निंभोर दे.

शेतीकाम सुरळीत होईल, अशी मागणी होत आहे.अन्यथा निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा काही शेतकऱ्यांनी दिला असून प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.यावेळी विकास थोटे, राजेश पुणस, देवानंद थोटे, दिनेश थोटे, ऋषिकेश निंघोट, संदीप दिघडे, महेश निंगोट, भास्कर थोटे, नरेंद्र थोटे, विजय तालान यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# काँग्रेसचा स्वबळाचा करंटेपणा नडला!

## काँग्रेसचे मुस्लिमबहुल प्रभाग एमआयएमने खेचले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मुंबई–** २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीप्रमाणे जर काँग्रेसने उद्धव ठाकरे यांच्यासोबत मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत आघाडी केली असती तर आज ठाकरे बंधूंसह काँग्रेसची मुंबई महापालिकेत सत्ता आली असती. मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांच्यासह भाई जगताप अशा काँग्रेस नेत्यांचा स्वबळाचा हट्ट पक्षाला चांगलाच नडला, तसेच ठाकरे बंधूंचा मुंबई महापालिकेच्या सत्तेचा वारू काँग्रेस नेत्यांच्या हट्टामुळे रोखला गेला, हे निवडणूक निकालावरून स्पष्ट होत आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे गट आणि काँग्रेसच्या महाविकास आघाडीला चांगले यश आले होते. पण केवळ उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्याशी युती करताच वर्षा गायकवाड, भाई जगताप या नेत्यांनी राज ठाकरे यांच्यामुळे उत्तर भारतीयांची मते काँग्रेसला मिळणार नाहीत, अशी भीती काँग्रेस पक्षश्रेष्ठीकडे व्यक्त केली. तसेच प्रदेश काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी मनातही ठसविले. मुंबईत लोकसभेप्रमाणे आघाडी एकसंध राहिली पाहिजे, असे शरद पवार यांनी मुंबई काँग्रेसच्या नेत्यांना बोलावून समजावले. पण मुंबई काँग्रेसच्या नेत्यांचा निर्णय आधीच झाला होता. मुस्लिम आणि दलित मतांचे विभाजन भाजपच्या पथ्यावर पडेल, असा धोका मुंबई काँग्रेसच्या नेत्यांना सांगण्यात आला जगताप आणि गायकवाड हे नेते स्वबळाची भाषा करत राहिले. ठाकरे राहुल गांधी यांच्याशी बोलले. पण काही झाले नाही.स्वबळावर लढून २४ च्या आसपास काँग्रेस राहिली. २०१७ मध्ये त्यांचे ३१ नगरसेवक होते.

# अचलपूर नगरपालिकेच्या सभागृहात दुर्मीळ योगायोग

## नगराध्यक्ष पत्नीकडून पतीचा सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७परतवाडा :**

८अचलपूर नगर परिषदेच्या सभागृहात गुरुवारी एक दुर्मीळ आणि भावस्पर्शी क्षण अनुभवायला मिळाला. नगराध्यक्ष रूपाली अभय माथने यांनी चक्क नगरपालिकेच्या सभागृहात पती अभय माथने यांचा सन्मान केला. नगराध्यक्षांसह ४१ नगरसेवक या अनोख्या योगायोगाचे साक्षीदार ठरले. राजकारणात क्वचितच दिसणारा हा प्रसंग चर्चेचा विषय ठरला.अचलपूर नगरपालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपाच्या रूपाली अभय माथने या थेट जनतेतून नगराध्यक्षपदी निवडून आल्या आहेत. त्यांच्या या विजयामागे पती अभय माथने यांचा सिंहाचा वाटा राहिला. निवडणूक निकालानंतर अभय माथने यांनी पत्नीचा जाहीर सत्कार करून अभिनंदन केले होते. त्यानंतर आता भूमिकांची अदलाबदल होत नगराध्यक्ष पत्नीने पतीचा सन्मान केल्याने सभागृहात विशेष वातावरण निर्माण झाले.दि. १५ जानेवारी रोजी नगरपालिकेच्या सभागृहात स्वीकृत नगरसेवक म्हणून अभय माथने यांची निवड घोषित करण्यात आली. या घोषणेनंतर नगराध्यक्ष म्हणून रूपाली माथने यांनी पुढाकार घेत



पती अभय माथने यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व अभिनंदन केले. हा क्षण उपस्थित नगरसेवक, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठीही विशेष ठरला. सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला आणि हा प्रसंग भावनिक ठरल्याचे अनेकांनी व्यक्त केले.दरम्यान, याच बैठकीत उपाध्यक्षपदी निवडून आलेल्या काँग्रेसच्या खुर्शिदा बानी यांचेही नगराध्यक्ष रूपाली माथने यांनी तेवढ्याच आत्मीयतेने स्वागत, सन्मान व अभिनंदन केले. राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वपक्षीय समन्वयाचा संदेश देणारा हा प्रसंग मानला जात आहे.विशेष म्हणजे अचलपूर नगर परिषदेत अध्यक्ष आणि उपाध्यक्ष ही दोन्ही महत्त्वाची पदे महिलांकडे गेल्यामुळे अचलपुरात महिलाराज अशी चर्चा रंगली आहे. नगर परिषदेत पहिल्यांदाच महिलांच्या नेतृत्वाखाली कारभार होणार असून, विकासात्मक अजेंड्याला गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत. महिलांच्या नेतृत्वाखालील निर्णयप्रक्रिया, पारदर्शकता आणि विकासाभिमुख धोरणे अचलपूरच्या राजकारणात नवे पर्व घडवतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.




# ठाकरे भाई अब घर पर रहें, वर्क फ्रॉम...!

## BMC निवडणूक निकालावर शिंदे सेनेचा निशाणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७मुंबई–** बृहन्मुंबई महानगरपालिकेतील २२७ वार्डांची मतगणना सुरू आहे. आतापर्यंतच्या निकालानुसार, बीएमसीमध्ये भाजपा महायुती ११८ जागांवर आघाडीवर दिसत आहेत. तर ठाकरे बंधू ६९ जागांवर आघाडीवर दिसत आहेत. तसेच, काँग्रेस १२ जागांवर आघाडीवर दिसत आहे. यातच शिंदेसेनेच्या नेत्या शायना एनसी यांनी विरोधी पक्षांकडून वारंवार केल्या जाणाऱ्या आरोपांवर प्रश्न उपस्थित करत ठाकरेंनाही स्क्रिप्ट बदलण्याचा सल्ला दिला आहे.

शिवसेना नेत्या म्हणाल्या, उद्धव ठाकरे यांनी त्यांचा पटकथालेखक (स्क्रिप्ट रायटर) बदलायला हवा आणि नवी कारणे शोधायला हवीत. जनता विजय आणि पराभव ठरवते. संदेश असा आहे की जमिनीवर काम करणाऱ्यांना संधी मिळते. घरून काम करणाऱ्यांना घरीच राहावे लागते. त्यांनी राज्यातील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी



केलेल्या प्रयत्नांवर प्रकाश टाकला आणि उद्धव सेना राज्याचा विकास करण्यात अपयशी ठरल्याचा आरोप केला.

ठाकरे बंधूंवर टीका करताना शायना एनसी म्हणाल्या, त्यांनी २५ वर्षांत काहीही केले नाही. पण आमचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन टप्प्यांत खड्ड्यांचा प्रश्न सोडवला. त्यांनी २६ भ्रष्ट कंत्राटदारांना तुरुंगात पाठवले. मागील सरकार सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पही देऊ शकले नाही. आम्ही ७ दिले. विकासाच्या बाबतीत, आम्ही ५,००० इलेक्ट्रिक बसेस, ४३५ किमी मेट्रो कनेक्टिव्हिटी आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवले आहेत. एवढेच नाही तर, बीएमसी निवडणुकीसाठी युती करणाऱ्या ठाकरे बंधूंनी घरून काम करावे आणि घरीच राहावे, असेही त्या म्हणाल्या.

शायना एनसी पुढे म्हणाल्या, ज्यांना वाटते, घरून काम करता येते, त्यांच्यासाठी हा काळ राजकारण आणि कामगिरी करण्याचा आहे, केवळ आडनावांवरून मते मिळवण्याचा नाही. आमचे नेते एकनाथ शिंदे सामान्य लोकांसाठी समर्पित राहिले आणि त्यांच्यासाठी काम केले, ज्यामुळे त्यांचा विश्वास निर्माण झाला.

# माझं घर तोडलं, आज त्यांचं गर्वहरण झालं

## उद्धव ठाकरेंच्या पराभवानंतर कंगना रणौतची बोचरी टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

मुंबई महानगरपालिकेच्या रणधुमाळीचा निकाल समोर आला असून, महायुतीने मुंबईवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. ठाकरे कुटुंबाचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या मुंबईत आता भाजप-शिवसेना (शिंदे गट) युतीचा महापौर बसणार आहे. या विजयानंतर भाजप खासदार आणि अभिनेत्री कंगना रणौतने उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार निशाणा



साधला आहे. माझं घर तोडणाऱ्यांना आता जनतेनेच सत्तेतून बेदखल केलं, अशा शब्दांत तिने आपल्या भावना व्यक्त केल्या.

**'आज महाराष्ट्रानं त्यांना सोडलं'**

मुंबई महापालिकेच्या निकालावर प्रतिक्रिया देताना कंगना म्हणाली की, हा निकाल म्हणजे माझ्यासाठी न्याय आहे.

२०१० मध्ये बीएमसीने कंगनाच्या कार्यालयावर केलेल्या कारवाईची आठवण करून देत ती म्हणाली, ज्यांनी मला शिवीगाळ केली, माझं घर पाडलं आणि मला महाराष्ट्र सोडण्याची धमकी दिली, आज त्याच महाराष्ट्राने त्यांना सोडून दिले आहे. काळ कोणासाठीच थांबत नाही, आज निसर्गाने न्याय केला आहे.

**नेपोटिझम आणि माफियावर प्रहार–** कंगना पुढे म्हणाली की, महिलांचा द्वेष करणाऱ्या आणि नेपोटिझम माफियाला जनतेने त्यांची खरी जागा दाखवून दिली आहे, याचा मला मनापासून आनंद आहे. तिने बोलताना या विजयाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजप कार्यकर्त्यांना दिले. या 'भगव्या लाटे'मुळे मुंबईत एका नवीन युगाची सुरुवात झाल्याचेही तिने नमूद केले.

**'उद्धव ठाकरे, आज तुमचं गर्वहरण झालं!'**

– सोशल मीडियावर सध्या कंगनाचा २०२० मधील एक व्हिडिओ तुफान व्हायरल होत आहे. ज्यावेळी तिचे कार्यालय पाडण्यात आले होते, तेव्हा तिने उद्धव ठाकरेंना उद्देशून म्हटले होते, उद्धव ठाकरे,

तुम्हाला काय वाटतं? तुम्ही फिल्म माफियांसोबत मिळून माझं घर तोडून मोठा सूड घेतलात? लक्षात ठेवा, आज माझं घर तुटलंय, उद्या तुमचं गर्वहरण होईल. हे काळाचं चक्र आहे, ते फिरत राहतं. आजच्या निकालानंतर कंगनाचे ते शब्द खरे ठरल्याची चर्चा नेटकऱ्यांमध्ये रंगली आहे.

# मुंबई हातून गेली, पण परभणी मिळवली;

## परभणी मनपावर उद्धवसेना-काँग्रेस आघाडीचा कब्जा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७परभणी–** शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत उद्धव ठाकरे गटाची शिवसेना आणि काँग्रेस आघाडीने स्पष्ट बहुमत मिळवत महापालिकेवर सत्ता प्रस्थापित केली आहे. एकूण ६५ जागांच्या सभागृहात उद्धव सेनेने सर्वाधिक २५ जागा पटकावत आपले वर्चस्व सिद्ध केले, तर काँग्रेसने १२ जागा जिंकत आघाडी मजबूत केली आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा फटका बसला असून पक्षाला केवळ ११ जागांवर समाधान मानावे लागले आहे. भाजप १२ जागांवर आडला आहे.




**अंतिम पक्षनिहाय निकाल**

- उद्धवसेना : २५
- काँग्रेस : १२
- भाजप : १२
- राष्ट्रवादी काँग्रेस : ११
- जन सुराज्य पक्ष : ३
- यशवंत सेना : १
- अपक्ष : १

प्रभागनिहाय निकाल पाहता अनेक प्रभागांत उद्धव सेनेचा दबदबा स्पष्ट दिसून आला. प्रभाग क्रमांक २, ३, ८ आणि १२ मध्ये उद्धव सेनेने सर्वच्या सर्व जागा जिंकल्या. काँग्रेसने प्रभाग ११ मध्ये चारही जागांवर विजय मिळवला, तर प्रभाग ७ मध्ये काँग्रेसला तीन आणि एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे. भाजपला प्रभाग ५ मध्ये चार जागा मिळाल्या असून प्रभाग १५ मध्ये तीन जागांवर यश मिळाले.

राष्ट्रवादीला प्रभाग ६ मध्ये चार जागा मिळाल्या असल्या तरी इतर ठिकाणी पक्षाची पिछाडी ठळकपणे दिसून आली. प्रभाग १३ मध्ये जन सुराज्य पक्षाने तीन जागा जिंकत आश्चर्यकारक कामगिरी केली आहे. यशवंत सेनेला एक जागा मिळाली आहे.या निकालामुळे परभणी महापालिकेतील सत्तासमीकरण पूर्णपणे बदलले असून उद्धव सेना-काँग्रेस आघाडीचे नेतृत्वाखाली स्थिर सत्ता येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान, राष्ट्रवादीसाठी हा निकाल आत्मपरीक्षणाचा ठरणार असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

# निकालानंतर अजित पवारांची पहिली प्रतिक्रिया:

## जनतेचा कौल सर्वोच्च, पूर्ण आदरानं स्वीकारतो

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७मुंबई–** राज्यातील मुंबईसह विविध महानगरपालिकांच्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर राजकीय वातावरण तापले असतानाच उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते अजित पवार यांनी संयमी आणि समतोल भूमिका मांडत प्रतिक्रिया दिली आहे. निकाल काहीही असो, जनतेचा निर्णय अंतिम आणि सर्वोच्च असतो, असा स्पष्ट संदेश त्यांनी आपल्या पोस्टमधून दिला आहे. विजयी उमेदवारांचे अभिनंदन करतानाच जिथे अपेक्षित यश मिळाले नाही, तिथे आत्मपरीक्षण करून नव्या जोमाने काम करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे त्यांच्या प्रतिक्रियेकडे केवळ राजकीय भाष्य म्हणून नव्हे, तर पुढील राजकीय वाटचालीचा संकेत म्हणून पाहिले जात आहे.

अजित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये सर्वप्रथम जनतेच्या निर्णयाला नतमस्तक होत, जनतेचा कौल हा सर्वोच्च आहे आणि तो आम्ही पूर्ण आदरानं स्वीकारतो, असे ठामपणे नमूद केले आहे. निवडणुकीत विजय मिळवलेल्या सर्व उमेदवारांचे त्यांनी मनापासून अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छाही दिल्या आहेत. सत्तेत येणाऱ्या नव्या नगरसेवकांनी केवळ राजकारणापुरते मर्यादित न राहता, नागरिकांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करावे आणि विकासकामांना गती द्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला सर्वत्र अपेक्षित यश मिळाले नाही, ही बाब अजित पवारांनी अप्रत्यक्षपणे मान्य केली आहे. मात्र, या अपयशाकडे ते निराशेच्या दृष्टीने न पाहता, नव्या जबाबदारीच्या रूपात पाहत असल्याचे त्यांच्या वक्तव्यातून स्पष्ट होते. जिथे जनतेचा अपेक्षित कौल मिळाला नाही, तिथे जनतेचा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी अधिक प्रामाणिकपणे, अधिक जबाबदारीने आणि दुप्पट जोमानं काम करत राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. ही भूमिका



राजकीय परिपक्वतेचे दर्शन घडवणारी मानली जात आहे.

अजित पवार यांनी केवळ आपल्या पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांनाच नव्हे, तर निवडणुकीत यशस्वी ठरलेल्या सर्व पक्षांच्या उमेदवारांनाही एक प्रकारचे मार्गदर्शन केले आहे. विजयी उमेदवारांनी आपल्या महानगरपालिकांमध्ये जनतेच्या प्रश्नांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, विकासकामे आणि लोककल्याणाच्या योजनांना गती द्यावी, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. सत्ता ही सेवा करण्याची संधी असते, हा अप्रत्यक्ष संदेश त्यांच्या वक्तव्यातून देण्यात आला आहे.

त्याचबरोबर, जे उमेदवार या निवडणुकीत विजयी होऊ शकले नाहीत, त्यांच्यासाठीही अजित पवार यांनी महत्त्वाचे आवाहन केले आहे. पराभवामुळे निराश न होता, जनतेसाठी कार्यरत राहावे आणि जनहित हेच केंद्रस्थानी ठेवावे, असा सल्ला त्यांनी दिला आहे. निवडणूक जिंकली किंवा हरली तरी लोकांसाठी अखंड काम करत राहणे हेच खरे ध्येय असले पाहिजे, असे ते म्हणाले आहेत. या भूमिकेमुळे पक्षातील कार्यकर्त्यांना नवी उर्जा आणि पुढील संघर्षासाठी दिशा मिळेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

**ताकदीने काम करण्याचा निर्धार–** एकूणच, महानगरपालिका निवडणुकांच्या निकालानंतर अजित पवार यांनी मांडलेली भूमिका ही आक्रमक राजकारणापेक्षा समतोल, संयम आणि लोकशाही मूल्यांवर आधारित असल्याचे दिसून येते. जनतेचा कौल मान्य करून पुढील काळात अधिक ताकदीने काम करण्याचा निर्धार त्यांनी स्पष्ट केल्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेसची पुढील रणनीती ही आत्मपरीक्षण, संघटन मजबूत करणे आणि जनतेचा विश्वास परत मिळवण्यावर केंद्रित असेल,

# अकोल्यात भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेवकावर जीवघेणा हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अकोला**

महानगरपालिका निवडणुकेचे निकाल जाहीर झाल्यानंतर आकोल्यामध्ये राजकीय तणावातून भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेवकावर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना शुक्रवारी (दि.१६) रात्री घडली. नगरसेवकावर रुग्णालयात उपचार असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. शरद तूरकर असे हल्ल्यात जखमी झालेल्या नवनिर्वाचित नगरसेवकाचे नाव आहे.

आकोला महानगरपालिकेत प्रभाग क्रमांक २ मधून निवडणूक लढवित भारतीय जनता पक्षाचे शरद तूरकर विजयी झाले. त्यानंतर तूरकर समर्थकांनी प्रभागातून त्यांची विजयी मिरवणूक काढली. यादरम्यान हल्लेखोरांनी त्यांच्यावर हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. घटनेनंतर शरद तूरकर यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. या घटनेनंतर काही काळ



परिसरात तणाव निर्माण झाला होता. यादरम्यान वाहनांची तोडफोडही करण्यात आली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

# नागपूरला प्रदूषणमुक्त शहर बनवायचेय

## सर्व आश्वासने पूर्ण करायची आहेत, नितीन गडकरींच्या विजयी नगरसेवकांना सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७नागपूर** नागपूर महापालिकेत विजय मिळाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी विजयी नगरसेवकांचे अभिनंदन करण्यासाठी एकत्र आले होते. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी संवाद साधला तसेच गडकरी यांनी नागपूरला सुंदर आणि प्रदूषणमुक्त शहर बनवायचे असल्याचे निर्देश नवनिर्वाचित नगरसेवकांना केले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागपूरच्या जनतेने मोठा विजय आपल्याला दिला आहे. महाराष्ट्रात एकणच भाजपने या निवडणुकीत मोठा रेकॉर्ड केला आहे आणि २९ पैकी २५ महापालिकांमध्ये आपली सत्ता आली आहे. महाराष्ट्रातला सर्वात मोठा पक्ष भाजपच आहे हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. मी सगळ्यांचे अभिनंदन करतो. मला विश्वास आहे, येत्या काळात विकासाचा अजेंडा जो आहे, तो आपण वेगाने पुढे नेऊ.

नितीन गडकरी म्हणाले, आपल्या नागपूरमध्ये यश मिळाले आहे, आपल्या शहरात जे काही उत्तम कार्य आपण केले, त्याचा परिणाम म्हणून आपल्याला चांगले यश मिळाले आहे. आपण आश्वासन दिले आहे की प्रदूषणमुक्त शहर आपण तयार करणार आहोत. ही वचने



आपल्याला पूर्ण करायचे आहे. या निवडणुकीत आपल्या कार्यकर्त्यांनी, आमदारांनी उत्तम काम केले आहे.

पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले, नागपूर शहरात, विदर्भात आणि महाराष्ट्रात चंद्रशेखर बावनकुळे यांनी खूप काम केले आहे. त्यांनी परिश्रम करून विजय मिळवून दाखवला आहे. येणाऱ्या काळात जसा आपल्याला आनंद आहे, तशी जबाबदारी वाढली आहे. जे नगरसेवक निवडून आले आहेत, जनतेच्या ज्या अपेक्षा आहेत, जे प्रश्न आहेत, ते सोडवायचे आहेत. हा विजय आपल्या पक्षाचा नेत्रदीपक विजय आहे. आता पुन्हा एकदा आपल्याला संधी मिळाली आहे. हा विजय आपल्याला नम्रपणे स्वीकारायचा आहे. जनतेच्या आशा आकांक्षा पूर्ण करायच्या आहेत, असे आवाहन गडकरी यांनी केले आहे.यावेळी बोलताना नितीन गडकरी यांनी मोठा विजय मेळावा आयोजित करण्याचे आवाहन केले. तसेच या कार्यक्रमात संगीत आणि जेवणाची मेजवानी माझ्याकडून असेल, असेही त्यांनी यावेळी म्हटले.

### अमृता फडणवीसांचा राज-उद्धव ठाकरेंच्या युतीवर अप्रत्यक्ष निशाणा

# भेदभावाचे राजकारण करणाऱ्यांना सूचक संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७मुंबई –** मुंबई महानगरपालिका निवडणुकीतील भाजपच्या ऐतिहासिक विजयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी ठाम शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. मराठी माणसाने विकास, प्रगती आणि कामगिरीला प्राधान्य देत भाजपला कौल दिला असून भाषा-प्रांताच्या नावावर भेदभावाचं राजकारण करणाऱ्यांना हा स्पष्ट इशारा आहे, अशा शब्दांत त्यांनी या निकालामागील जनतेचा संदेश अधोरेखित केला आहे. देवेंद्र फडणवीसांची मुलगी दिविजा यांनीही वडीलांना मिठी मारुन आनंद व्यक्त केला.



मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवत ऐतिहासिक यश संपादन केलं आहे. देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईवर पहिल्यांदाच भाजपची सत्ता स्थापन होत असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वात हा मोठा राजकीय टप्पा गाठण्यात आला आहे. या निकालामुळे मुंबई महानगरपालिकेत भाजपचा महापौर विराजमान होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. अनेक दशकांपासून काँग्रेस आणि शिवसेना या पक्षांच्या ताब्यात राहिलेल्या बीएमसीत भाजपने अखेर सत्ता मिळवत आपली ताकद सिद्ध केली आहे.या विजयाने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून भाजप समर्थकांमध्ये जल्लोषाचं वातावरण आहे. मुंबईतील मतदारांनी विकास, पायाभूत सुविधा आणि प्रशासनातील स्थैर्य या मुद्द्यांना प्राधान्य देत भाजपच्या बाजूने कौल दिल्याचं या निकालातून दिसून येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात राबवण्यात आलेल्या विविध विकासकामांचा प्रभाव थेट मुंबई महानगरपालिका निवडणुकीवर पडल्याचं राजकीय विश्लेषक मानत आहेत. भाजपच्या या विजयामुळे राज्यात सत्ताधारी पक्षाची पकड अधिक मजबूत झाल्याचंही चित्र आहे. या ऐतिहासिक विजयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी खास प्रतिक्रिया देत आनंद व्यक्त केला. त्यांनी विजयाबद्दल देवेंद्र फडणवीस यांचं औक्षण करत कुटुंबीय आनंद साजरा केल्याचं पाहायला मिळालं. राजकीय यश केवळ आकड्यांपुरतं मर्यादित नसून, त्यामागे असलेली मेहनत आणि लोकांचा विश्वास याचं प्रतीक असल्याचं त्यांनी आपल्या प्रतिक्रियेतून अधोरेखित केलं. एका पत्नीच्या भूमिकेतून त्यांनी व्यक्त केलेला हा आनंद आणि अभिमान भाजप समर्थकांसाठी भावनिक क्षण ठरला.अमृता फडणवीस यांनी आपल्या शब्दांतून केवळ अभिनंदनच केलं नाही, तर विरोधकांवर सूचक शब्दांत टीकाही केली. आज मराठी माणसाने विकासकामांना महत्त्व देणाऱ्या, प्रगती साधणाऱ्या पक्षाला भरभरून मतदान करून आपली पसंती दिली आहे, असं म्हणत त्यांनी या विजयामागील जनतेची भूमिका स्पष्ट केली. त्याचबरोबर, मराठी माणसावरून, भाषा आणि प्रांतावरून निरर्थक भेदभावाचं राजकारण करणाऱ्यांना हा एक सूचक संदेश आहे, असं म्हणत त्यांनी विरोधकांच्या राजकारणावर थेट बोट ठेवलं. या शब्दांतून मुंबईच्या मतदारांनी कोणत्या प्रकारचं राजकारण नाकारलं आहे, हेही त्यांनी अधोरेखित केलं.'आज मराठी माणसाने विकासकामांना महत्व देणाऱ्या, प्रगती साधणाऱ्या पक्षाला भरभरून मतदान करीत आपली पसंती दिली आहे आणि मराठी माणसावरून, भाषा, प्रांतावरून निरर्थक भेदभावाचे राजकारण करणाऱ्यांना सूचक संदेश दिलेला आहे. अभिनंदन देवेंद्र फडणवीस' अशा शब्दांत अमृता फडणवीस यांनी विरोधकांना टोला लगावला आहे.

# प्रभाग निहाय उमेदवारांना मिळालेली मते

## प्रभाग क्र. १ शेगाव रहाटगाव

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| कल्याणी तायडे (विजयी) | भाजपा | ४९६८ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| चंद्रकांत खेडकर (विजयी) | राष्ट्रवादी | ५७९० |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| वंदना प्रदीप मडघे (विजयी) | भाजपा | ४९६७ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| गुड्डु उर्फ प्रशांत धर्माळे (विजयी) | राष्ट्रवादी | ७५१३ |

## प्रभाग क्र. २ संत गाडगेबाबा पीडीएमसी

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| विनोद तानवैस (विजयी) | भाजपा | ४४४९ |
| रवि वानखडे | राष्ट्रवादी | ३८५१ |
| प्रल्हादराव तायडे | कॉंग्रेस | २६६० |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| मिनल सवाई (विजयी) | राष्ट्रवादी | ५०५४ |
| स्वाती निस्ताने | भाजपा | ४३४९ |
| नम्रता पावडे | कॉंग्रेस | २६०० |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| सुरेखा लुंगारे (विजयी) | भाजपा | ४०६४ |
| राजश्री क्षीरसागर | राष्ट्रवादी | ३७११ |
| चित्रा शिवहरी कुलट | कॉंग्रेस | २६४८ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| प्रमोद महल्ले (विजयी) | राष्ट्रवादी | ४५२१ |
| बाळु भुयार | कॉंग्रेस | ३२४२ |
| बादल कुळकर्णी | भाजपा | ३१४६ |

## प्रभाग क्र. ३ नवसारी

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| अनिता काळे (विजयी) | कॉंग्रेस | ६०१४ |
| प्रतिभा खंडारे | भाजपा | ४४५१ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| प्रशांत महल्ले (विजयी) | कॉंग्रेस | ५६३५ |
| जहीर अ. कबीर अ. | एमआयएम | ३०२६ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| लुभना तनवीर सै. मकदुम (विजयी) | कॉंग्रेस | ५४७६ |
| रिता मोकलकर | भाजपा | ४०९७ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| ऋषीकेश देशमुख (विजयी) | भाजपा | ५९२९ |
| प्रशांत डवरे | राष्ट्रवादी | ४००७ |

## प्रभाग क्र. ४ जमीन कॉलनी - लालखडी

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| अ. शाह अ. शाह (विजयी) | एमआयएस | १००७१ |
| अ.नफीज अ. हफीज | राष्ट्रवादी | ३६८७ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| फरहानाज सै.मिर अ.अली (विजयी) | | १२५११ |
| नाजीया परवीन जकी मुल्ला | राष्ट्रवादी | ४१५३ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| कुबरा बानो करामत अली (विजयी) | | १३०७६ |
| फौजीया तहसीम नदीमुल्ला | राष्ट्रवादी | ३९५३ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| सलाउद्दीन इकरामुद्दीन (विजयी) | | १०८२६ |
| निसार अहमद आलम खान | कॉंग्रेस | ३७०३ |

## प्रभाग क्र. ५ महेंद्र कॉलनी-न्यू कॉटन मार्केट

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| सुनिता लोणारे (विजयी) | भाजपा | ३७४२ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| माधुरी ठाकरे (विजयी) | भाजपा | ४८७१ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| राजश्री जटाळे (विजयी) | कॉंग्रेस | ४१५७ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| धिरज हिवसे (विजयी) | कॉंग्रेस | ३०२२ |

## प्रभाग क्र. ६ विलास नगर-मोरबाग-गवळीपुरा

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| संजय नरवने (विजयी) | भाजपा | ५६५९ |
| गौतम नाईक | कॉंग्रेस | ४४६८ |
| परमानंद अहरवार | शिवसेना | २९७० |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| रेखा तायवाडे (विजयी) | उबाठा | ५१७६ |
| कुसूम साहु | भाजपा | ४८८६ |
| सरोज गुप्ता | राष्ट्रवादी | ४१३७ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| पुजा अग्रवाल (विजयी) | भाजपा | ५४६६ |
| स्वाती काशिकर | कॉंग्रेस | ४६५१ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| दिपक साहु (विजयी) | वायएसपी | ६३०३ |
| हफीज खान हप्पु | कॉंग्रेस | ४१८३ |
| राजेश पड्डा (साहु) | भाजपा | २४९६ |

## प्रभाग क्र. ७ जवाहर स्टेडियम

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| सोनाली नाईक (विजयी) | भाजपा | ५७०८ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| मनिष जाधव (विजयी) | राष्ट्रवादी | ५२३३ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| स्नेहा लुल्ला (विजयी) | शिवसेना | ४२३३ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| श्रीचंद तेजवानी (विजयी) | भाजपा | ४७०५ |

## प्रभाग क्र. ८ जोग स्टेडियम - चपराशीपुरा

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| मालता गवई (विजयी) | कॉंग्रेस | ५१७३ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| अर्चना आत्राम (विजयी) | कॉंग्रेस | ५२७३ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| अस्मा फिरोज खान (विजयी) | कॉंग्रेस | ६०५३ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| नितीराजसिंग शेखावत (विजयी) | कॉंग्रेस | ६११४ |

## प्रभाग क्र. ९ एसआरपीएफ - वडाळी

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| विशाल वानखडे (विजयी) | कॉंग्रेस | ३११० |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| पंचफुला चव्हाण (विजयी) | भाजपा | ३३०० |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| ममता आवारे (विजयी) | राष्ट्रवादी | २७०६ |

## प्रभाग क्र. १० बनोडा-भिमटेकडी-दस्तुर नगर

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| डॉ. मधुरा काहाळे (विजयी) | | ४८९८ |
| सुजाता जवंजाळ | | ३९८२ |
| विजयकिर्ती भोंगळे | | ३०५० |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| अर्चना पाटील (विजयी) | | ४४०७ |
| संध्या टिकले | भाजपा | ४०५० |
| नंदा पवार | | ३२०० |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| मंगेश मनोहरे (विजयी) | राष्ट्रवादी | ४८९४ |
| नितीन बोरेकर | भाजपा | ३९६७ |
| अजय गोंडाने | बसपा | ३८४० |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| अविनाश मार्डीकर (विजयी) | राष्ट्रवादी | ६५६८ |
| गौरव खोंड | | २९७२ |
| ऋषी खत्री | | २६२५ |

## प्रभाग क्र. ११ फ्रेजरपुरा - रुख्मिणी नगर

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| विद्या माटे (विजयी) | बसपा | ४२३९ |
| रोहीनी रावेकर | भाजपा | ३९८६ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| ईस्माईल लालुवाले (विजयी) | बसपा | ३६८४ |
| शैलेश राऊत | भाजपा | ३५०३ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| नुतन भुजाडे (विजयी) | भाजपा | ५४५७ |
| शाहीदा बानो अ. हफीज | बसपा | ३९५८ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| सचिन वैद्य (विजयी) | बसपा | ४५६४ |
| अलका सरदार | भाजपा | ३२७५ |

## प्रभाग क्र. १२ स्वामी विवेकानंद कॉलनी - बेलपुरा

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| राधा कुरील (विजयी) | भाजपा | ४०२९ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| प्रिती रेवणे (विजयी) | वायएसपी | ३६०३ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| स्मिता सुर्यवंशी (विजयी) | भाजपा | ४३७७ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| बंडु उर्फ प्रदीप हिवसे (विजयी) | भाजपा | ५४४५ |

## प्रभाग क्र. १३ अंबापेठ-गौरक्षण-नमुना

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| मिलींद बांबल (विजयी) | भाजपा | ७०४६ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| लविना हर्षे (विजयी) | भाजपा | ५८१३ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| सौ.स्वाती कुलकर्णी (विजयी) | भाजपा | ५९५७ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| रतन डेंडुले (विजयी) | राष्ट्रवादी | ३९९३ |

## प्रभाग क्र. १४ जवाहर गेट - बुधवारा

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| विलास इंगोले (विजयी) | कॉंग्रेस | १२२६८ |
| अविनाश देऊळकर | भाजपा | ४९६१ |
| मो. जाकीर अ.मजीद | राष्ट्रवादी | ७३६ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| सुनिता भेले (विजयी) | कॉंग्रेस | ७४४१ |
| संगीता बुरंगे | भाजपा | ३७८३ |
| विशाखा हरमकर | उबाठा | ३१४७ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| ललिता रतावार (विजयी) | कॉंग्रेस | ८६६६ |
| गंगा खारकर | भाजपा | ५९८० |
| अनिशा चौबे | राष्ट्रवादी | १६१३ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| संजय शिरभाते (विजयी) | कॉंग्रेस | ५६७२ |
| विवेक कलोती | भाजपा | ४७४६ |
| राजेंद्र खारकर | शिवसेना | २७४४ |

## प्रभाग क्र. १५ छाया नगर-पठाणपुरा

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| शाह अफसर शाह सादिक (विजयी) | | ५२९० |
| शाह नुरुल तबस्सुम रफीक | | ४५१४ |
| शाहेदा बानो मो. अयुब | | ४४०० |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| सै.राशीद अली (विजयी) | | ६३४३ |
| सिराज सुलेमान मेमन | | ५८८९ |
| सोहेल अनवर बारी | | ५७५८ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| खा. आसिया अंजुम वहिद (विजयी) | | ६०२७ |
| नसिम सुलताना मो. शारीक | | ५३०९ |
| नाजिया तरन्नुम अ.हमीद | | ४१९५ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| शे.जफर शे. जब्बार (विजयी) | राष्ट्रवादी | ९९२३ |
| अंसारी शबाना परवीन मुजबिल हक | | ७८०८ |

## प्रभाग क्र. १६ रहमत नगर- अलीम नगर

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| शाह बीबी बतुल ताहेर (विजयी) | एमआयएम | ९२०१ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| मरियम बानो मो. ईस्माईल रारानी (विजयी) | | ९४०८ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| मोहम्मद रेहान मो. यासीन (विजयी) | | ९८०५ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| शेख हमिद शेख वाहेद (विजयी) | एमआयएम | १००८२ |

## प्रभाग क्र. १७ गडगडेश्वर-रवी नगर

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| योगेश विजयकर (विजयी) | वायएसपी | ७३०२ |
| नरेंद्र आठवले | मनसे | २९२६ |
| अमोल सरकटे | उबाठा | २०६४ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| अर्चना पांडे (विजयी) | वायएसपी | ६३०६ |
| सुनंदा खरड | भाजपा | ५२९२ |
| सुवर्णा राऊत | शिवसेना | २५४० |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| प्रियंका पाटणे (विजयी) | वायएसपी | ८९६५ |
| मृणाली चौधरी | भाजपा | ४१३५ |
| संगीता वाघ | कॉंग्रेस | २१५७ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| आशिष अतकरे (विजयी) | भाजपा | ६७७० |
| राजा बांगडे | वायएसपी | ५९४९ |
| राहुल माटोडे | शिवसेना | १४६९ |

## प्रभाग क्र. १८ राजापेठ - संत कंवरराम

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| नंदा सावदे (विजयी) | | ४९३६ |
| प्रणाक्षी झांबानी | | ४६१४ |
| ॲड. अपर्णा ठाकरे | भाजपा | २४४९ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| प्रा. प्रशांत वानखडे (विजयी) | वायएसपी | ५४६० |
| चेतन पवार | भाजपा | ४२६३ |
| अभिषेक हजारे | | २६८६ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| पद्मजा कौंडण्य (विजयी) | भाजपा | ५६७८ |
| माधुरी बाखडे | | ३९१३ |
| मयुरी जवंजाळ | | १३९८ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| महेश मुलचंदानी (विजयी) | | ५४७२ |
| राजेंद्र महल्ले | | ३५९४ |
| प्रमोद पांडे | | १२४३ |

## प्रभाग क्र. १९ साई नगर - अकोली

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| चेतन गावंडे (विजयी) | भाजपा | ६०७६ |
| उदय पर्वतकर | वायएसपी | ५७४२ |
| सागर देशमुख | | २३६९ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| मंजुषा जाधव (विजयी) | भाजपा | ७८२५ |
| सरिता मालाणी | | ५६६४ |
| हर्षदा गडकरी | | १९५८ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| लता देशमुख (विजयी) | भाजपा | ५३१७ |
| गौरी इंगळे | | ४०६५ |
| रिना नंदा | | ३३६० |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| सचिन भेंडे (विजयी) | वायएसपी | ९०५८ |
| तुषार भारतीय | भाजपा | ४१७९ |
| गोलु मानके | | १५१६ |

## प्रभाग क्र. २० सुतगिरणी-सामरा नगर

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| संजय गव्हाळे (विजयी) | | ५४६९ |
| वंदना हरने | | ५१३७ |
| बंटी रामटेके | प्रहार | ४९४० |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| सुमती ढोके (विजयी) | वायएसपी | ८६१८ |
| कोकीळा सोळंके | उबाठा | २८८५ |
| मेधा हिंगासपुरे | | २८२४ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| शारदा खोंडे (विजयी) | भाजपा | ७५३९ |
| कृतिका कडु | | ४५०९ |
| अश्विनी शिंदे | | २७२० |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| डॉ. राजेंद्र तायडे (विजयी) | शिवसेना | ६३२५ |
| सुनिल काळे | भाजपा | ६२८३ |
| संजय शेटे | उबाठा | २३२० |

## प्रभाग क्र. २१ जुनी वस्ती बडनेरा

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| मिरा कांबळे (विजयी) | एमआयएम | ५००५ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| नुजहत परवीन शाकीर हुसेन (विजयी) | | ४४३१ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| नजीबखान करीम खान (विजयी) | एमआयएम | ४५४६ |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| ज्ञानेश्वर आमले (विजयी) | वायएसपी | ४४७४ |

## प्रभाग क्र. २२ नवी वस्ती बडनेरा

(अ)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| रजनी डोंगरे (विजयी) | वायएसपी | ३८६४ |

(ब)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| अजय जयस्वाल (विजयी | वायएसपी | ६३८५ |

(क)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| गौरी मेघवाणी (विजयी) | वायएसपी | ४०६० |

(ड)

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | पडलेली मते |
|---|---|---|
| किशोर जाधव (विजयी) | वायएसपी | ४५६४ |


**विजयी उमेदवारांचे हार्दिक अभिनंदन**




# ‘युवा स्वाभिमानने भाजपचा गेम केला; सत्तेसाठी आता कुबड्यांची गरज’ - यशोमती ठाकूर यांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७ अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर भाजपवर जोरदार टीका करत काँग्रेसच्या नेत्या तथा माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाने भाजपचा व्यवस्थित गेम केल्याचा आरोप केला आहे. २०१७ च्या निवडणुकीत भाजपचे ४५ नगरसेवक निवडून आले होते, मात्र यंदाच्या निवडणुकीत भाजपला केवळ २५ जागांवर समाधान मानावे लागले, हीच बाब भाजपच्या अपयशाची साक्ष देणारी असल्याचे त्या म्हणाल्या.यशोमती ठाकूर म्हणाल्या की, निवडणुकीपूर्वी भाजपकडून आम्ही स्वबळावर सत्ता स्थापन करू, आम्हाला कुणाच्याही कुबड्यांची गरज भासणार नाही, असे दावे मोठ्या आत्मविश्वासाने केले जात होते. मात्र निकालानंतर चित्र पूर्णपणे बदलले असून, आता भाजपला सत्ता स्थापनेसाठी इतर पक्षांच्या आधाराची गरज पडणार आहे. ज्या युवा स्वाभिमान पक्षाकडे भाजपने दुर्लक्ष केले, त्याच पक्षासमोर आता भाजप लाचार



होणार आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.त्या पुढे म्हणाल्या की, रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाने १५ जागा जिंकून भाजपसमोर मोठे आव्हान उभे केले आहे. त्यामुळे भाजपला सत्ता स्थापनेसाठी कुबड्यांचा आधार घ्यावा लागणार असून, हे सरकार ‘लंगडं सरकार’ ठरणार आहे. सत्तेचा रिमोट भाजपकडे नसून इतरांच्या हातात राहणार असल्याचा दावाही त्यांनी केला.भाजपच्या प्रचारावरही यशोमती ठाकूर यांनी टीकास्त्र सोडले. भाजपसाठी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तब्बल १९ सभा घेतल्या. अनेक आमदार, मंत्री अमरावतीत तळ ठोकून प्रचारात उतरले. प्रचंड पैसा, यंत्रणा आणि सत्ता वापरली गेली. तरीही जनतेने भाजपला स्पष्टपणे नाकारले आहे, असे त्या म्हणाल्या. ही निवडणूक जनशक्ती विरुद्ध धनशक्ती अशी झाली असून, जनतेने धनशक्तीवर जनशक्तीचा विजय सिद्ध केला, असा दावाही त्यांनी केला.दरम्यान, काँग्रेसने १५ जागा जिंकत आपली ताकद कायम राखली असून, भाजपविरोधी मतांचे विभाजन झाले नसते, तर चित्र आणखी वेगळे असते, असेही ठाकूर यांनी सूचक वक्तव्य केले. भाजपचा आत्मविश्वास खच्ची झाला असून, आगामी काळात महापालिकेतील राजकारण अधिक अस्थिर राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

# जर भाजपा राणांची मदत घेत असेल तर आम्ही भाजपा सोबत जाणार नाही - संजय खोडके

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

महापालिकेच्या निवडणुकीत २५ जागा जिंकून भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी सत्तास्थापनेसाठी भाजपला २० नगरसेवकांची गरज लागणार आहे. महायुतीची सत्ता स्थापन होईल, अशी शक्यता वर्तविण्यात येत असतानाच सत्तास्थापनेचा मार्ग सुलभ नसल्याचे दिसून आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट हा महायुतीचा घटक पक्ष असला, तरी पक्षाने महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढवली. राष्ट्रवादीला ११ जागा मिळाल्या. महापालिकेवर झेंडा फडकविण्यासाठी भाजपला राष्ट्रवादीची देखील मदत घ्यावी लागणार आहे. मात्र, भाजप रवी राणांच्या युवा स्वाभिमान पक्षाला सोबत घेणार असेल, तर राष्ट्रवादी काँग्रेस भाजपसोबत जाणार नाही, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संजय खोडके यांनी घेतल्याने पेच निर्माण झाला आहे.



संजय खोडके म्हणाले, भाजपने आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षासोबत युती केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस भाजपसोबत राहणार नाही, असे आपण निवडणुकीपुर्वीच स्पष्ट केले होते. अजूनही आपली तीच भूमिका कायम आहे. भाजपने सत्ता स्थापनेसाठी रवी राणांची मदत घेतल्यास राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेपासून दूर राहणे पसंत करेल. सत्ता स्थापन करण्यासाठी कुणासोबत युती करायची किंवा नाही, याचा निर्णय पक्ष घेणार आहे. पक्षाच्या आदेशाची आपण प्रतीक्षा करीत आहोत.

भाजप आणि युवा स्वाभिमान पक्ष मिळून महापालिकेवर सत्ता स्थापन करू आणि भाजपचाच महापौर होईल, असा दावा आमदार रवी राणा यांनी केला आहे. त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना संजय खोडके म्हणाले, रवी राणांनी त्यांची भूमिका मांडली आहे. आपण निवडणुकीपूर्वी घेतलेल्या भूमिकेवर कायम आहोत. रवी राणा हे भाजपसोबत युती करणार असतील, तर आपण भाजपची मदत करणार नाही. अद्याप स्थानिक पातळीवर भाजपकडून आपल्याशी यासंदर्भात चर्चेसाठी संपर्क साधलेला नाही.

# मुंबईचा महापौर शिंदेंचाच? नवा फॉर्म्यूला तयार; सगळे नगरसेवक राजधानीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७ मुंबई**

महाराष्ट्रातील २९ महानगर पालिका निवडणूक निकाल समोर आले आहेत. या निवडणूकीत भाजपाने चांगली कामगिरी केली आहे. सर्वांचे लक्ष मुंबई महानगर पालिकेत भाजपाची सत्ता येणार का ? याकडे लागले होते. भाजपाच्या रणनितीला यश येत उद्धव ठाकरे यांची २५ वर्षांची पालिकेची सत्ता नष्ट झाली. आता मुंबईचा महापौर कोणाला करायचे यावर भाजपाची रणनिती सुरु आहे. एकनाथ शिंदे यांच्यामुळे भाजपाची मुंबईत सत्ता येणे शक्य झाल्याने शिंदे यांनी बार्गेनिंग पॉवर चांगलीच वाढली आहे.



मुंबई महानगर पालिकेच्या २२७ जागांपैकी महायुतीने ११८ जागा जिंकल्या आहेत. भाजपा ८९ जागांवर विजय मिळवल सर्वात मोठा पक्ष ठरला आहे.तर एकनाथ शिंदे यांच्या पक्षाने २९ जागा जिंकल्या आहेत. २५ वर्षांनंतर ऐतिहासिक मुंबई महानगर पालिकेवर भाजपाचा महापौर विराजमान होणार आहे. मुंबईचा महापौर हिंदू मराठी असेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. शिंदे आणि भाजपा यांच्या अडीच वर्षे महापौर पद वाटून घेण्याचा प्रस्ताव एकनाथ शिंदे यांनी ठेवला आहे. परंतू यावर भाजपाकडून अजून संमती मिळालेली नाही. महापौर निवड लॉटरी पद्धतीने चिठ्ठी टाकून केली जाणार आहे.

मुंबईत ८९ जागा मिळवणारी भाजपा मुंबईत आपला महापौर असावा यासाठी आग्रही आहे. या संदर्भात भाजपात विचारमंथन सुरु आहे. आता लॉटरीची वाट पाहिली जात आहे. एकनाथ शिंदे यांच्या गटाचे नेते देखील महापौर पदासाठी आपला दावा करत आहेत. अडीच-अडीच वर्षे महापौर पद वाटून घ्यावे अशी मागणी एकनाथ शिंदे यांच्या नेते आपल्या नेत्याकडे करीत आहेत.

शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते अडीच वर्षे शिवसेनेचा महापौर असावा अशी मागणी करत आहेत. मात्र, भाजपाचे श्रेष्ठी यासाठी तयार होतील की नाही हा प्रश्नच आहे. त्यामुळे आता यावरुन युतीच्या दोन्ही पक्षात पुन्हा नाराजी नाट्य घडण्याची शक्यता आहे.

# निकालानंतर लगेच उद्धव ठाकरेंना पहिला झटका बसणार का?

## काल रिझल्ट लागला आणि आज एक नगरसेवक...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

कालच मुंबईसह २९ महानगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. यात मुंबईसह शेजारच्या ठाण्यातील आणि कल्याण-डोंबिवलीमधील निवडणूक प्रतिष्ठेची होती. यात मुंबईत काही प्रमाणात ठाकरेंना आपला गड राखण्यात यश आलं. पण ठाणे आणि कल्याण-डोंबिवलीत एकनाथ शिंदे यांनी आपला बालेकिल्ला अभेद्य ठेवला. कल्याण-डोंबिवलीत एकूण १२२ नगरसेवक बसतात. इथे २१ नगरसेवक आधीच बिनविरोध निवडून आलेत. यात १५ भाजपचे आणि सहा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे होते. काल निकाल जाहीर झाला. त्यात केडीएमसीमध्ये एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे ५४ तर भाजपचे ५० नगरसेवक निवडून आले. केडीएमसीमध्ये युती नव्हती. दोन्ही पक्ष स्वतंत्रपणे लढले.



आता कालच निकाल लागला. त्यानंतर KDMC मध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. उद्धव ठाकरे शिवसेनेच नवनिर्वाचीत नगरसेवक मधुर म्हात्रे थेट आज खासदार श्रीकांत शिंदे यांच्या भेटीला पोहोचले. KDMC निवडणुकीतील विजयी उबाठाचे नगरसेवक मधुर म्हात्रे यांची खासदार श्रीकांत शिंदेंसोबत भेट झाली. भेटीचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने राजकीय चर्चांना उधाण आलं आहे. मधुर म्हात्रे यांनी भाजपचे माजी उपमहापौर विक्की तरे यांचा पराभव करत विजय मिळवला. फोटो व्हायरल होताच संभाव्य राजकीय हालचालींवर तर्कवितर्क सुरू झाले आहेत.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत विजय झालेल्या उमेदवारांना आदित्य ठाकरे यांनी फोन करून शुभेच्छा दिल्या. कल्याण पश्चिमेतील पॅनल क्रमांक ६ मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचं संपूर्ण पॅनल विजयी झालं. या ठिकाणी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील माजी महापौर वैजयंती ताई घोलप आणि तीन वेळा नगरसेवक असलेले संजय पाटील अशा दिग्गज नगरसेवकांविरोधात लढून यश मिळवलं. ठाकरे गटाच्या विजयी उमेदवारांना आदित्य ठाकरे यांनी व्हिडिओ कॉल करत शुभेच्छा दिल्या. या पॅनल मधून ठाकरे गटाचे निवडून आलेल्या संकेश भोईर यांचे आदित्य ठाकरेंनी खास शब्दांत अभिनंदन केले. पॅनल ६ मधील विजयामुळे कल्याण पश्चिमेत ठाकरे गटाचे बळ अधिक मजबूत झाले आहे.

# ‘बघू देवाच्या मनात असेल तर तेही होईल’

## मुंबई महापौरपदाबाबत मातोश्रीवरुन उद्धव ठाकरे यांचं मोठं वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

आपल्यामध्ये आणि भाजपमध्ये खूप फरक आहे. त्यांना वाटतं की कागदावरची शिवसेना त्यांनी संपवली, पण जमिनीवरची शिवसेना ते कधीच संपवू शकत नाहीत. कारण ते कधी जमिनीवर राहू शकत नसल्याचा खणखणीत टोला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी लगावला. मातोश्रीवर बोलताना उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटासह भाजपवर हल्लाबोल केला. मुंबईतील नवनिर्वाचित नगरसेवकांनी आज मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. उद्धव ठाकरे म्हणाले की यशाचे मानकरी तुम्ही सगळे आहात. आम्ही फक्त निमित्त मात्र आहोत. जो निकाल या सगळ्या परिस्थितीमध्ये लागला तो अभिमानास्पद असल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले. त्यांनी सांगितले की साम दाम दंड भेद यंत्रणेचा दुरुपयोग करून सगळं काही केलं. गद्दार निघून गेले मात्र ते निष्ठा विकत घेऊ शकले नाहीत. मी सगळ्यांना मानाचा मुजरा




करतो आणि जबाबदार आपली वाढली असल्याचं ठाकरे यांनी नमूद केलं.


उद्धव यांनी पुढे सांगितले की आपला महापौर व्हायला पाहिजे हे तर स्वप्न आहे. देवाच्या मनात असेल तर तेही होईल असं सूचक विधान सुद्धा उद्धव ठाकरे यांनी यावेळी केलं. त्यांनी पुढे सांगितले की, गद्दारी करून त्यांनी विजय मिळवला आहे तो मुंबई गहाण ठेवण्यासाठीच असल्याचा हल्लाबोल त्यांनी केला. ते म्हणाले की या पापाला मराठी माणूस कधी क्षमा करणार नाही. मात्र, तुम्ही अभिमानाने लढला, तुम्ही निष्ठेसाठी लढला त्यामुळे तुमचा अभिमान असल्याचे त्यांनी नमूद केले. ते म्हणाले की जेव्हा मी फिरत होतो त्यावेळी कोणत्याही सोयी सुविधा आपण देऊ शकलो नाही. आपल्याकडे तन मन त्यांच्याकडे फक्त धन आहे. आपण शक्तीच्या बळावर त्यांना घाम फोडल्याचे त्यांनी सांगितले. ही शक्ती अशीच एकत्र ठेवा पुढच्या पिढ्याला सुद्धा तुमचा अभिमान वाटेल असेही ठाकरे यावेळी म्हणाले. ते म्हणाले की यश मी तुमच्या चरणी नतमस्तक होऊन विजयाच्या श्रेय तुम्हाला देत आहे. ही लढाई संपलेली नाही, जिद्द महत्त्वाची आहे आणि ती कोणीही विकत घेऊ शकत नाही. जिद्दीच्या जोरावर आपण परत जिंकू असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.

# घराणेशाही पार्श्वभूमी असलेले राज्यातील अनेक उमेदवार पराभूत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

राज्यातील महापालिका निवडणुकीत राजकीय घराणेशाहीची पार्श्वभूमी असलेल्या अनेकांना उमदेवारी देण्यात आली. पण, मतदानाचा हक्क बजावणाऱ्या मतदारानं लोकप्रतिनिधी निवडताना घराणेशाहीतून आलेल्या उमेदवारांनाही नाकारतो, हे शुक्रवारच्या निकालातून दाखवून दिलं आहे.

राज्यातील २९ महापालिका निवडणुकीचे निकाल लागत असताना काही उमेदवारांच्या चेहऱ्यावर हसू तर काही उमेदवारांच्या डोळ्यात अश्रू असे दृश्य आज दिसून आले. उल्लेखनीय बाब म्हणजे महानगरपालिका निवडणुकीत मतदारांनी काही महत्त्वाच्या मतदारसंघांमध्ये घराणेशाहीच्या राजकारणाला मोठा धक्का दिला. त्यामुळे या निवडणुकीत आमदार, खासदार आणि मंत्र्यांच्या अनेक जवळच्या नातेवाईकांना पराभवाला सामोरे जावं लागलं आहे. त्याचबरोबर मातब्बर नेत्यांनाही निवडणुकीत पराजय स्वीकारावा लागला.



भाजपाचे माजी विरोधी पक्षनेते रवी राजा (वार्ड १८५) आणि प्रभाकर शिंदे (वार्ड १०६) यांच्यासारख्या अनुभवी नेत्यांनाही मतदारांनी नाकारलं आहे.

### घराणेशाहीतून आलेले हे उमेदवार झाले पराभूत

विवेक कलोती यांचा संजय शिरभाते यांच्याकडून पराभव: राज्यात भाजपाला विजय मिळवून देणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मावसभाऊ विवेक कलोती यांचा अमरावती महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे उमेदवार संजय शिरभाटे यांनी पराभव केला.

### समाधान सरवणकर यांचा निशिकांत शिंदे यांच्याकडून पराभव

माजी आमदार सदा सरवणकर (शिवसेना, शिंदे गट) यांचे पुत्र समाधान सरवणकर यांचा निवडणुकीत पराभव झाला. शिवसेना (यूबीटी) आमदार सुनील शिंदे यांचे बंधू निशिकांत शिंदे यांनी प्रभाग क्रमांक १९४ मधून विजय मिळवला आहे. त्यांनी शिवसेना नेते सदा सरवणकर यांचे पुत्र समाधान सरवणकर यांचा ६०३ मतांनी पराभव केला.

### दीप्ती वायकर यांचा लोना राजेंद्रसिंह रावत यांच्याकडून पराभव

शिवसेनेचे खासदार रवींद्र वायकर यांना महापालिका निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या कन्या दीप्ती वायकर यांचा महापालिका निवडणुकीत पराभव झाला आहे. दीप्ती वायकर यांचा शिवसेना (यूबीटी) उमेदवार लोना राजेंद्रसिंह रावत यांनी पराभव केला. जोगेश्वरी पूर्व हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा बालेकिल्ला मानला जातो. येथे शिवसेनेच्या उमेदवारानं दीप्ती वायकर यांचा पराभव केला.

### वैशाली शेवाळे यांचा आशा काळे यांच्याकडून पराभव

माजी खासदार, शिवसेना नेते राहुल शेवाळे यांच्या वहिनी वैशाली शेवाळे यांचा पराभव झाला. काँग्रेसच्या उमेदवार आशा दीपक काळे यांनी प्रभाग १८३, धारावी येथून विजय मिळवला. त्यांनी शिवसेनेच्या वैशाली शेवाळे यांचा १,४५० मतांनी पराभव केला.

### कॅप्टन मलिक यांचा अश्रफ आझमी यांच्याकडून पराभव

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) नेते नवाब मलिक यांचे बंधू कॅप्टन मलिक यांचा पराभव झाला. कुर्ला पश्चिम येथील प्रभाग १६५ मधून निवडणूक लढवणारे कॅप्टन मलिक यांची घराणेशाही मतदारांनी नाकारली. तर काँग्रेसचे उमेदवार अश्रफ आझमी यांनी मोठ्या फरकानं विजय मिळविला आहे.

### तुषार भारतीय यांचा सचिन भेंडे यांच्याकडून पराभव

भाजपाचे आमदार श्रीकांत भारतीय यांचे बंधू तुषार भारतीय यांचा अमरावती महापालिका निवडणुकीत साई नगर प्रभागात पराभव झाला आहे.

### योगिता गवळी यांचा सुरेखा लोखंडे यांच्याकडून पराभव

दगडी चाळीतील कुख्यात गुंड अरुण गवळी यांची मुलगी योगिता गवळी यांचा मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भायखळा येथील प्रभाग क्रमांक २०७ मधून पराभव झाला आहे. योगिता गवळी यांनी अखिल भारतीय सेना पक्षाच्या वतीने भायखळा येथील प्रभाग क्रमांक २०७ मधून निवडणूक लढवली होती. परंतु भाजपच्या उमेदवारानं केवळ ४३ मतांच्या फरकानं विजय मिळवत त्यांचा पराभव केला.

# महापालिकेत अपयश, आता दोन्ही राष्ट्रवादी एकत्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १७ मुंबई**

राज्यात एकूण २९ महानगरपालिकांची निवडणूक संपली आहे. या निवडणुकीत भाजपाचा बोलबाला पाहायला मिळाला. बहुसंख्य महापालिकांत भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मुंबई, ठाणे, कल्याण डोंबिवली यासारख्या महत्त्वाच्या पालिकांत भाजपा आणि एकनाथ शिंदे यांच्या महायुतीची सत्ता आली आहे. तर पुणे, पिंपरी चिंचवड या दोन महत्त्वाच्या पालिकांत भाजपाने मुसंडी मारत दोन्ही राष्ट्रवादींना धुळ चारली आहे. दरम्यान या निवडणुकी झालेला पराभव लक्षात घेऊन मोठ्या घडामोडींना वेग आला आहे. लवकरच शरद पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे.



महापालिकेच्या निवडणुकीत अजित पवार यांची राष्ट्रवादी तसेच शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने मोठा जोर लावला होता. परंतु या दोन्ही पक्षांना अपेक्षित यश मिळालेले नाही. पुणे आणि पिंपरी चिंचवड या दोन्ही महापालिका जिंकण्यासाठी राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र आले होते. शरद पवार यांच्या पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे या अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे घड्याळ चिन्ह हाती घेऊन प्रचार करताना दिसल्या. परंतु या दोन्ही पक्षांना अपेक्षित यश मिळालेले नाही. २०१७ सालच्या निवडणुकीत राष्ट्रवादीला पुण्यात तब्बल ३९ जागा मिळाल्या होत्या. परंतु यावेळी अजित पवारांना येथे २७ जागा मिळाल्या. शरद पवार यांच्या पक्षाला तर फक्त तीनच जागा मिळाल्या. शरद पवार यांच्या पक्षाला तर एकूण १८ महापालिकांत खातंदेखील उघडता आलं नाही.




आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत